माझ्या करितां खटपट करून अण्णासाहेबांनीं मला तेथें दादासाहेबांकडे लावला. तर हा देखील तेथेंच, बरें कॅशच्या हेड क्लार्कचा तर असोच पण आमच्या कडच्या हेड क्लार्कचा सुद्धां तोच लाडका ! त्याचें कारण देखील मला ठाऊक आहे. हे कारकून लोक म्हणजे नुसते कुतरे आहेत कुतरे. '' बोलतां बोलतां त्याचा आवाज चढूं लागला व चेहरा लाल होऊं लागला. "शुद्ध कुतरे ! धन्याच्या आवडी करितां स्वतःची बऱ्यावाईटाची आवड निवड बाजूला ठेवतील. निवळ गुलाम ! या लोकांना स्वतःचें मत नाहीं–स्वतःची पारख नाहीं. सुंद्याला आजारी-पणांतून दादासाहेबांनीं वांचविला आणि त्यांनीं त्याला आपल्या पदरीं ठेवला. तेव्हां तो त्यांच्या आवडीचा असला पाहिजे असें समजून सर्व आफिसांतले लोक त्याच्या कामाचीच शिफारस करितात. मीं कितीही झटून काम केलें, तरी मला कोणीच विचारीत नाहीं. भल्याची दुनियाच नव्हे. तर मग आपण तरी भलेपणानें कां रहावें ?"

" कां रहावें ?" भुंवया वक्र करून मिस्किलपणानें गणूकडे पहात हरीनें खोंचून ह्मटलें.

" होय बुवा, कां रहावें ?" त्याचेंच अनुकरण करून गणूनें पांच मजली हास्यध्वनि काढला.

" तुम्हांला हांसूंच येतें ना ? जगच माझ्यावर उलटलें आहे. मी जातों कसा येथून—" असें म्हणून गोविंद फणकाऱ्यानें निघाला.

" जा. जा." हरीनें म्हटलें. पण तो आठ दहा पावलें गेला तोंच धांवत जाऊन हरीनेंच त्याला "अहो राजे ! जरा थंड तर व्हा !" असें ह्मणून ओढीत खोलींत आणलें व खोली बंद करून घेतली.

" मी सांगूं कां ?" हरी म्हणाला "मी—"

" मी सांगूं का ? मी सांगूं का, कशाला ? सांगायला कोणी तोंड धरलें आहे तुझें ?" गोविंदानें अत्यंत त्रासिकपणानें विचारलें.

"छे, छे, छे बुवा ! हें प्रकरण फारच गरम झालें–अरे रामा, रामा—"

छोट्या धनीसाहेबांची हांक ऐकून रामा गडी धांवतच आला. त्याला पाहून हरी म्हणाला, " अण्णा आहेत काय ? "

" न्हाइत. " रामा गड्यानें उत्तर दिलें.

" जा तर, तीन थंडा लिंबू घेऊन ये बघूं झटपट ! " असें म्हणून हरीनें पैशाकरितां खिशांत घातलेला हात बाहेर काढतांना दोनचार विड्याही बाहेर पडल्या. त्या त्यानें पुन्हा खिशांत टाकून व एक ताबडतोब मुखांत धरून पेट-लेल्या आगकाडीचा व तिचा संयोग करून पुढील न्यायशास्त्रांतला सिद्धांत सांगूं लागला.

" हें-पहा गोविंदराव ! गरम होऊं नकाः कारण "यत्र यत्र धूमः तत्र तत्र वन्हिः " आणि याच्या उलट, हरीभाऊ हंसत हंसत व विडीचा धूर सोडीत म्हणाले—यत्र यत्र वन्हिः तत्र तत्र धूमः हें कोणालासें म्हणतांना मी ऐकलें आहे. तेव्हां तुमच्या अंगाची संतापानें जर अशी आग झाली तर तुमच्या मोठ्या मोठ्या आशांचा आणि कर्तबगारीचा देखील धूर होऊन जाईल. तुम्ही आमच्यापेक्षां हुषार, शहाणे, चतुर, बोलके, शिवाय आतां ऑफिसर ऊर्फ कारकून ! आज-पर्यंत तुम्हीं आह्माला हरएक वेळीं बुद्धि सुचवीत आलांत, कॉपी दाखवलीत आणि सहाव्या यत्तेपर्यंत आणून पोंचवलेंत ! आज त्या तुमच्या सर्व उपकारांचा कांहींतरी उतराई व्हावें असें माझ्या मनांत आलें आहे. तेव्हां तुम्हांला मी एक युक्ति सुचवितों. पण जरा थांबा ! अगोदर पक्की थंडाई येऊं द्या. वाजले किती सहाच ना ? आतां कांहीं तें कारटं येणार नाहीं ? "

"कोण दामू कीं काय ? " गोविंदानें हांसत विचारलें.

" हंः हें रामानें काय आणलें तें अगोदर घ्या पाहूं ! " असें म्हणून रामानें आणलेल्या, शिरा, भजीं आणि लेमनच्या बाटल्यांचा समाचार घेऊन झाल्यावर हरीनें चेहरा जरा गंभीर करून हळू हळू बोलण्यास सुरवात केली.

" हें पहा गोविंदराव ! मी मघांपासून जी सुंद्र्याबद्दलची माहिती विचारली ती कांहीं उगीच विचारली नव्हती. मी त्याच गोष्टीचा विचार करीत होतों. जे जे उपाय आम्हीं योजावे ते ते कसे फसतात पहा ! विन्याचें एकदांचें काळें झालें म्हणून समाधान वाटतें खरें, पण हें दामल्यांचें कारटें केव्हां उलटेल याचा नेम नाहीं. कारण तें आहेच मुळीं चमत्कारिक. त्याला चुचकारून धरलें पाहिजे. त्या दिव-सापासून तो आला नाहीं कसा याचें मला आश्चर्य वाटत आहे. तुला नोकरी मिळाली पण त्या सुंद्र्याचा दुप्पट डाव साधला. केलेलें राहिलें सर्व बाजूला ! आणि उलट त्या दिवशींच्या त्या अपघाताला कारण कोण याचा सर्व लोक कसून

तपास करताहेत ? पण आपण तिघे लहान असलों तरी या सर्व लोकांना पुरून उरेसे आहोंत. त्याची काळजी नको ! काय खरें कीं नाहीं गणू ? ''

''हो ! हो ! बाकी आजच्या डावाच्या वेळेस तूं सांगितलेल्या युक्तीचा मी खेळतां खेळतां पुनः पुन्हा विचार केला. तुझ्या चातुर्याची तारीफ करावी तेवढी थोडींच बेटया ! मला अगदीं पसंत आहे ! '' गणू पत्त्यांचीं पानें चाळीत चाळीत म्हणाला.

'' होय ना ? पहा गोविंद, तुझ्याकरितां एक बेमालूम युक्ति शोधून काढली आहे. अशी कीं त्याची पुरी दुर्दशाच व्हावी. पूर्वी आपण एक केलेली कृति भिजत पडली आहे. तिचा जरी अद्याप उपयोग झालासा दिसत नाहीं, तरी वेळेवर ती फळास आल्याशिवाय कधींच राहणार नाहीं. कारण अण्णा तें अजून विसरले नाहींत. पांच रुपयांची नोट तर गेलीच ! अर्थात् अण्णासाहेबांचें सुंदरविषयीं बिघडलेलें मन कांहीं शुद्ध होत नाहीं. त्यांत आणखी ह्या नवीन युक्तीचा डाव साधला, कीं बार उडाला. काय गणपत ? असें म्हणून हरीनें पुढें हात केल्याबरोबर गणूनेंही ताबडतोब टाळी दिली. त्याच टाळीच्या आवाजांत खोलीच्या दरवाजावर पण धक्का बसला. तो त्यांना ऐकूं गेला नव्हता.

''तुम्हीं एकमेकांना टाळ्या देऊन देखील मोकळे झालांत ! पण मला युक्ति सांगितलीतच नाहींत अजून ! '' गोविंद ह्मणाला.

इतक्यांत दुसरी थाप बसली. त्याबरोबर त्यांनीं जरा चमकून इकडे तिकडे पाहिलें व दार वाऱ्यानें हललें असें मानून पण जरा विशेष हलक्या आवाजानें त्यांनीं बोलण्यास सुरवात केली. हरी ह्मणाला—

'' गोविंदराव, मी तुला युक्ति सांगतों. पण तूं ती केली पाहिजेस.''

'' माझी तयारी आहे.'' गोविंद म्हणाला.

''तयारी तोंडानें ह्मणून चालणार नाहीं. त्याला धैर्य लागेल.'' हरी म्हणाला.

'' माझ्या धैर्याची कसोटी तर पाहा. पण लवकर सांग काय ती ! मला लवकर गेलें पाहिजे. काम आहे जरूरीचें.'' गोविंद म्हणाला.

इतक्यांत दारावर दोन जोराचे धक्के बसले व ''अरे हरी, दार उघड'' असे शब्द कानावर आले.

त्यावरोबर आंत सर्व गुपचूप झालें. तिघांनींही एकमेकांस गप्प राहण्याची बोटानें खूण केली.

" कोण आहे ?" हरीनें जोरानें विचारलें.

" अरे मी तो दामू ! असें काय करतोस ? दार उघड लवकर !"

दरवाजा उघडला व दामू आंत शिरला आणि दरवाजा पुन्हा मिटला.

" कसें काय दामूअण्णा ! बऱ्याच दिवसांनीं आलांत तुह्मी. होतां कुठे इतके दिवस ?" हरीनें व गणूनें एकदम विचारलें.

"मी बाहेर गांवीं गेलों होतों. पण कायरे हरी ! गणू ! त्या दिवसापासूनच ह्मणे सुंदरला कोणी मरेपर्यंत बेदम मार दिला व तो अगदीं जगे कीं मरेपर्यंत झाला होता ?" दामूनें आश्चर्यानें विचारलें.

" बरें मग ? आतां काय त्याचें ? तो चांगला पूर्वीपेक्षां दुप्पट माजला आहे. पाहिला नाहींस का त्याला ?" हरी म्हणाला.

" असेल. पण लोक माझ्याविषयीं शंका घेत आहेत. मला उगीच ताल्या आमचे रागावले. मींच म्हणे त्याला मारायला लावला." दामू म्हणाला.

" बरं मग, तूं काय सांगितलेंस त्यांना ?" हरीनें काळजीनें विचारलें.

" मी म्हटलें. मला कांहींच माहिती नाहीं. मी फक्त त्याला मिशनऱ्यांच्या कँपची वाट दाखविली व मागें परतलों !"

" मग ?"

" मग काय ? रागावले आणि उगी राहिले ! झालें. पण मला बुवा संशय येतो. मला पुढें करून तुम्ही कांहींतरी कराल तर भीति वाटते. भारीच धाडशी आहांत तुम्ही. मला तुमचा असला स्वभाव आवडत नाहीं. उगीच तुम्ही हात धुवून त्या सुंदरच्या मागें लागतां. मला देखील त्याच्या घमेंडखोरपणाचा राग येतो. आणि त्या दिवशीं सर्वांस मार मिळून तोच तेवढा सुटला म्हणून मी तुमच्यांत आलों खरा व अजूनही आहें. असे रागावूं नका माझ्यावर–पण भलतेंच कांहीं करूं नका म्हणजे झालें. एवढेंच माझें म्हणणें–बरें मी जातों. एवढेंच मुद्दाम तुम्हांला सांगायला आलों–म्हटलें सुचवून जावें–मला जायचें आहे."

" रे. बैस, कुठें जाणार आहेस–" त्याचा हात धरून गणू म्हणाला.

" नाहीं नाहीं. निकडीचें काम आहे–जातों मी—"

"अरे जाशील. थांब–थांब—" गणू पुनः आग्रहपूर्वक म्हणाला.

" अंहं, सोडा मला–सोडा–जाऊं द्या. " दामू म्हणाला.

" इतकी पण घाई कसली ? " त्याचे हात सोडून दोघांनीं विचारलें.

" गोविंदराव पण–आज बोलले नाहींत कांहींच. मग मला आतां वेळ नाहीं. " असें अजून एकही शब्द न बोललेल्या व विचारांतच असलेल्या गोविंदाला म्हणून दामू निसटला.

तो गेल्यावर तिघेही यथेच्छ हांसले.

" काय अजागळ पोर हें आहे तरी " हरी म्हणाला.

" अजून त्याच्याकडून खूप काम घ्यायचें आहे. त्याला राखूनच धरला पाहिजे " गणू म्हणाला.

गोविंदा फक्त हांसला. पण त्याचें लक्ष हरीच्या चेहऱ्याकडे होतें. लवकर काय ती एकदा युक्ती सांग, अशा त्याच्या बघण्याचा कोणींही अर्थ केला असता.

शेवटीं हरीनें इकडेतिकडे एकवार पाहिलें व ह्मणाला. " भिंतीला देखील कान असतात. तुम्ही जरा आपला कान इकडे करा पाहूं ! "

गोविंदानें कान पुढें केला. हरीनें त्याच्या कानांत कांहीं सांगितलें. त्याबरोबर त्याचा चेहरा अधिकच विचारयुक्त व अंगावर केवढी तरी मोठी जबाबदारी पडल्यामुळें चिंता पडल्यासारखा झाला. तो एक पाऊल मागें सरला व ह्मणाला.—

" पण मला हें झेपेल म्हणतोस ? "

" कां नाहीं झेपणार ? याशिवाय बुवा आपल्याकडे दुसरी युक्ति नाहीं. "

" पहा, मला तुझी युक्ति पसंत आहे. बरोबर बठली तर हटकून लागू पडेल. गोळी चुकली तर उलटा प्रकार होईल. ह्मणून म्हणतों." गोविंद म्हणाला.

" तें तर खरेंच; म्हणूनच बिनतोड काम उरकलें पाहिजे. आणि ह्यांतच तुमची मर्दुमकी, तुमची चिकाटी–तुमचें धैर्य–तुमचा शत्रूविषयींचा खरा तिटकारा–वगैरे वगैरे–सर्व चांगल्या गुणांचा कस लागणार, तो आतां इथेंच. बाकी आह्मी जसे आतांपर्यंत वागत आलों तसे पुढेंही तुला मदत करावयाला हवे तेव्हां एका पायावर तयार ! त्याबद्दल तूं अगदीं निर्धास्त रहा. "

पहा, हो. नाहीं तर, सर्वच घोटाळा होईल." गोविंद म्हणाला.

" झालें; हा भितरेपणा" गणू म्हणाला.

" मारे इतके गरम झालां होतां त्या सुंद्रावर, ते आतां थंड्या लिंबानें इतके गारठलांत ? फारच परिणामकारक बुवा थंडा लिंबू ! कोणाच्या दुकानांतला तो ? विचारला पाहिजे रामाला. कारण तो चांगल्या मर्दाला देखील भागूबाई बनवतो."

हरीचे हे शब्द गोविंदाला वर्मी लागले. त्याचा संताप पुन्हा भडकला. तो मूळचा धिम्या स्वभावाचा. पण एकाद्याच्या मनांत एकच विषय भरला आणि तिकडे त्याचें अहोरात्र लक्ष लागलें, कीं त्याच्या स्वभावांत देखील प्रसंगवशात् थोडा फार फरक पडतो. वास्तविक पहातां आतांपर्यंत गोविंदा हा हरी व गणू यांस आपल्या युक्तीनें व स्वतःच्या हिकमतीनें आपल्या हातांतल्या कळसूत्री बाहुल्यांप्रमाणें नाचवीत होता. पण सुंदर त्याचा प्रतिस्पर्धी झाल्यामुळें त्याच्या मनांत धुमसणारा द्वेषाग्नि धुमसून धुमसून शेवटीं त्यानें पेट घेतलाच. धुमसणारी आग अदृश्य असते. पण तिनें पेट घेतला, कीं ती सगळ्यांस दिसते. गोविंदाच्या मनांत धुमसणारी आग तो आतांपर्यंत कावेबाजपणानें दाबून ठेवीत असे. पण हल्लीं ती भडकल्यामुळें त्यानें त्याच्या अंगाची लाही होत होती. व त्यामुळें गोविंद स्वतःच त्या जोडीच्या हातांत गेला. शिवाय राग हा एक षड्विकारांपैकींच आहे. हे जे दुष्ट बिकार माणसाला पकडण्याकरितां टपून बसलेले असतात ते त्याच्या मनांत रिघावयाला वाट शोधीत असतात. वाट सांपडेपर्यंत ते कमजोरच असतात. पण एकदा का त्यांनीं मनांत–शरीरांत ठाणें दिलें, कीं मग ते तिचे मिरासदार झाले ह्मणून समजावें. शेवटीं विचार करून गोविंद ह्मणाला–

" मी कोणतेंही कार्य विचार केल्याशिवाय हातांत घेत नाहीं व तें एकदा घेतल्यानंतर त्याचा पिच्छा पुरविल्याशिवाय अर्ध्यावर सोडणार नाहीं. " दांत ओंठ चावून निश्चयानें गोविंदानें म्हटलें.

" ठीक ठीक. पाहूं आतां याचा प्रत्यय " हरीनें व गणूनें ह्मटलें. गोविंद निघून गेल्यावर हरी व गणू दोघेही एकमेकांकडे पाहून हंसले.

" ही युक्ति साधली, कीं आपलें काम झालें. " हरी ह्मणाला.

" आमच्या इथून गेला आणि दादासाहेबांच्या घरीं राहायला मिळालें म्हणून तो फारच शेफारला आहे. परत त्यानें माझीं धोतरें धुतलींच पाहिजेत." हातपाय आपटून गणू म्हणाला.

" धुतलींच पाहिजेत. " दुप्पट जोरानें हरीनें म्हटलें.

प्रकरण नववें.

विनायकाचें पत्र.

सुंदर व गोविंद दादासाहेबांच्या कारखान्यांत नोकरीला लागून बरेच दिवस झाले होते. सुंदरला, गोविंद आपला द्वेष करीत असतो, हें हळूहळू कळून येऊं लागलें होतें. पण त्याचा असा समज होता, कीं कोणीं कितीही आपला द्वेष केला तरी जर आपण परमेश्वराचे घरीं खरे अन्यायी नसलों तर माणसाच्या द्वेषाची परवा करण्याचें प्रयोजनच नाहीं. चार दिवस दुःख भोगावें लागेल एवढेंच. शिवाय जें एक जुनें तत्त्व कीं—

अतृणे पतितो वन्हिः स्वयमेवोपशाम्यति ।

त्याच्यावर त्याचा पक्का भरंवसा होता. तो ह्मणे, कितीही दुष्ट माणूस जरी झाला तरी त्याच्या कृतीस आपण प्रतिकृतीनें उत्तरच दिलें नाहीं, कीं तो आपोआपच दमून गप्प बसणार ! कारण एका हातानें कधींच टाळी वाजत नाहीं. अर्थात् अशा लोकांशीं एकानें वाईट कृत्य केलें तर आपण तसलेंच किंवा त्याच्याहून वाईट कृत्य करून हुजत घालीत बसण्यापेक्षां त्यांस पाठ देणें हाच उत्तम मार्ग. वास्तविक हा साधुवृत्तीचा मार्ग चांगला खरा, पण ह्या युगांत त्याचा ह्या जगांत दुष्ट लोकांबरोबर दिवस काढण्यास कितपत उपयोग होईल याची शंकाच आहे. बरें जशास तसें वागणें, हें देखील सर्वच गोष्टींत योग्य ठरत नाहीं. पहिला मार्ग साधुवृत्तीचा म्हणून चांगला ठरेल तर दुसरा न्याय्य आहे म्हणून ग्राह्य ठरेल. अर्थात् दोन्ही उपाय ग्राह्य असले तरी दोहोंचाही अवलंब करतांना काल व प्रसंग यांचा विचार करणें प्रत्येकास जरूरीचें आहे.

सुंदर पहिल्या मार्गाचा अवलंब करणारा मुलगा होता. आजपर्यंत तो अशाच रीतीनें वागलेला होता. पण त्याला आपला मार्ग कल्पनेप्रमाणें यशस्वी झालेला आढळून आला नाहीं. कारण दुष्ट लोक हे दुतोंड्याप्रमाणें असतात. त्यांच्या कृतीला दुसऱ्यानें उत्तर दिलें तर ते चिडतात यांत कांहीं नवल नाहीं. पण त्यांचा प्रतिपक्षी सत्यशील असला आणि तो जर आपला स्वस्थ बसला तरी देखील ते त्याला निगरगट्ट समजून अधिकच चवताळतात व त्याचा पक्का पिच्छा पुरवतात. ह्या गोष्टीचाच सुंदरला आतांपर्यंत अनुभव आला होता. जर कोणी आपलें अनहित केलें तर—

" शिक्षा देव तयाला करिल ह्मणूनी उगीच बैसावें "

असें म्हणून गोगल गाईप्रमाणें दुष्टांशीं नम्र बनण्यांत हंशील नाहीं असें विनायक त्यास केव्हां केव्हां सांगे. गोविंद, हरी किंवा गणू ह्या तिघांस जरी एकदम नाहीं तरी एक एकास नरम करण्याइतकी त्याच्या दंडांत ताकत होती. म्हणूनच सुंदरशीं लट्ठालठ्ठी करण्यास तो वयानें लहान असला तरी ते तयार नसत, आणि म्हणूनच ते नेहमीं आडमार्गांनें त्याच्याशीं लढत.

परंतु आतां तर काय त्याचा हितचिंतक विनायक हा देखील चक्रपुरांतून नाहींसा झाला. त्याला बिनाकारण एकसारखी मनांत भीति वाटे. आपल्याला उपजीविकेचें साधन मिळून अभ्यासक्रम चालू ठेवण्यास साधन मिळालें, ही ईश्वरानें दादासाहेबांच्या रूपानें आपणावर कृपाच केली आहे असें समजून तो परमेश्वराचे आभार मानी. दादासाहेबांविषयीं तर त्याच्या मनांत अत्यंत कृतज्ञता उत्पन्न झाली होती. एवढयापुरता तो आतां पूर्वीपेक्षां सुखी होता व त्याचें मन थोडेंसें हलकें झालें होतें. पण फार काळपर्यंत एकदम शांत झालेला समुद्र ह्मणजे लवकरच वादळ उत्पन्न होण्याचें जसें भविष्य सुचवितो तसाच, विरुद्धपक्षाचीं पोरें हल्लीं वरून दिसण्यांत तरी स्वस्थ बसल्यामुळें आपणावर एकाएकीं कांहींतरी भयंकर प्रसंग आणतील कीं काय असा त्यास रात्रंदिवस धोका वाटे. परंतु तो दादासाहेबांच्या कनवाळू, परोपकाररत व न्यायी स्वभावावरून परमेश्वराच्या कृपेवर भरंवसा ठेवून दिवस काढीत होता. दुसरी त्याला काळजी उत्पन्न करणारी गोष्ट म्हणजे त्याच्या आईची अस्वस्थ होणारी प्रकृति ही होय. सुंदर दुखण्यांतून बचावला पण त्या बाबतींत त्याच्या आईस–रमाबाईस फार प्रयास पडले होते. त्या त्रासानें तिची प्रकृति बिघडली व ती आजारी पडली. तथापि सर्व कामकाज, नोकरी सांभाळून व अभ्यासाची मेहनत करून मुलाच्या अंगावर पडतें म्हणून ती कसेंबसें स्वतःच करी आणि अशा रीतीनें तिनें बरेच दिवस औषधपाण्यावांचून दुखणें आंगावर तोललें.

सुंदरचा, विनायक हा एकटाच काय तो हितचिंतक होता हें मागें सांगितलेंच आहे. मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें जातांना तो सुंदरला भेटावयास आला होता. परंतु सुंदरच त्या वेळीं शुद्धींत नसल्यामुळें त्याची भेट झाली नाहीं. विनायकानें नाइलाज होऊन चक्रपूर सोडलें व तो मिशनऱ्यांबरोबर निघून गेला. परंतु त्यानें बरोबर आईस नेली नव्हती. आईला त्यानें आपल्या बरोबरच घ्यावें

असा मिशनऱ्यांचा त्याला अतिशयच आग्रह पडला. खर्चाची कोणत्याही प्रकारें ददात पडणार नाहीं असेंही त्यांनीं त्यास आश्वासन दिलें होतें. परंतु दूरदर्शीपणानें व अजूनही आशेचा तंतु साफ न तुटल्यामुळें त्यानें कशीतरी आईची समजूत करून तो स्वतःच मिशनऱ्यांबरोबर निघून गेला. मिशनऱ्यांबरोबर गेल्यावर त्याला त्यांनीं आपल्या मिशन हायस्कूलमध्यें ठेवलें. फी माफ होतीच. पुस्तकें वगैरे सर्व कांहीं मिळत असेच. याशिवाय कपडे देखील त्याला मिळूं लागले. इतकेंच नव्हे तर, पुढील आयुष्यक्रमाचीं जीं कल्पनेंचीं चित्रें त्याच्या डोळ्यांसमोर धरण्यांत येत त्यानें तर तो मोहित होऊन जाई. त्याला स्वधर्मीयांकडून अपमान, तिरस्कार, अनास्था सहन करून घेण्यापेक्षां परधर्मांत जाऊन जातील तितके दिवस तरी सुखानें घालविण्याचें कां सोडावें ? असें वाटे. उपासनेंत तो मिशनऱ्यांबरोबर मिसळत असेच. आतां फक्त बाप्तिस्मा देऊन त्याला पावन करून घेण्याचें पवित्र कर्तव्य मिशनऱ्यांचें राहिलें होतें, व एका मनुष्यप्राण्याचा उद्धार करण्याचें श्रेय केव्हां मिळवूं असें त्यांस होऊन गेलें होतें. शिकार आतां पक्की हातांत आली असें त्यांस वाटूं लागलें. अगदीं रस्त्यावरील भणंग भिकारी, कीं ज्यांस कसलेंच ज्ञान नाहीं, असे शेंकडों बाटविण्यापेक्षां एकादा श्रीमंत बाटविणें अधिक महत्वाचें त्यांस वाटे. व अशा शेंकडों श्रीमंतांपेक्षां एकादा साधारण स्थितींतला परंतु शिकलेला बाटविणें त्यांस त्याहूनही महत्वाचें होतें. विनायक कांहीं नाहीं तरी मॅट्रिकक्लास पर्यंत चढलेला मुलगा. असा आपल्या हातांत आला तर फार फायदा होईल असें वाटून त्यांच्या तोंडास पाणी सुटलें असलें तर नवल नाहीं, व याचसाठीं ते जरा हात सैल सोडून विनायकास मदत करूं लागले. अभ्यासक्रम संपल्यानंतर मिळणारी मोठाल्या पगारांची नोकरी व बढती, त्यामुळें मोठमोठ्या साहेबांपाशीं ओळख, वजन—त्याचमुळें त्याला तुच्छ व हीन लेखणाऱ्या समाजांतच प्राप्त होणारा दर्जा व अधिकार इत्यादि इत्यादि गोष्टींचे उठावदार रंगांत रेखाटलेले चित्रपट त्याच्या डोळ्यांस भूल पाडूं लागले.

बरें ! तशांत आतांपर्यंत शाळेंतल्या शिक्षणाबरोबर त्यास धर्मशिक्षण मिळतें तर असल्या मोहास त्यानें थोपवून धरिलें असतें. तें स्वधर्मशिक्षण शाळेंत नाहीं पण घरांतही नाहीं. खालच्या जातींत जन्म झाल्यामुळें वरच्या जातींतल्या व विशेषतः चांगल्या घराण्यांतल्या मुलांस जें नैतिक व धार्मिक गृहशिक्षण मिळतें त्याचाही त्यास अभाव. सुंदरनें ह्याच आनुवंशिक संस्कारांच्या जोरावर आपलें

शील कायम राखलें होतें. त्याच्या ह्या गृहशिक्षणामुळेंच त्यास परधर्मीयांची मदत घेण्यापासून परावृत्त केलें होतें. तो मनाचा जोर विनायकाच्या मनांत कुठून उत्पन्न व्हावा ? तरीही तो साधारण शिकलेला असल्यामुळें व सुंदरच्या आचारविचारांचा त्याच्या संगतीपासून त्याच्या मनावर बराच परिणाम झाल्यामुळें त्याला एकदम धर्मांतर करण्यास धैर्य होईना. शिवाय ह्याच्यापूर्वी अशाच गरीब मुलांस गोड थापा देऊन व त्यांस धर्मांतर करावयास लावून शेवटीं त्यांस फशीं पाडल्याचीं पुष्कळ उदाहरणें त्यास माहीत होतीं, नव्हे तीं त्याच्या डोळ्यांसमोर होतीं. म्हणून तो कांहींना कांहीं सबबी सांगून दिवसगत लावी.

त्यानें दिवस ढकलले तरी त्याला बिथरूं देतां नये, ही मिशनऱ्यांची इच्छा होती. कारण असे शिकलेले लोक त्यांस फार उपयोगी पडतात. प्रथम प्रथम मिशनऱ्यांनीं स्वतः हिंदुस्थानांतल्या देशी भाषा शिकून जीं बायबलचीं भाषांतरें केलीं ती भाषेच्या दृष्टीनें अगदीं भिकार झाल्यामुळें तीं वरच्या सुंदर चित्रांनीं युक्त व सुंदर गुळगुळीत कागदावर छापलेलीं होतीं ह्मणून जरी कोणी कोणी क्षणभर हातांत घेत, तरी वाचण्याचे कोणीही फारसे श्रम घेत नसत. परंतु पुढें पुढें शिकलेले लोक बाटल्यानंतर ते कुऱ्हाडीचे दांडेच आपल्या गोतास काळ होऊं लागले. ते आपल्या ज्ञानाचा, भाषाशैलीचा, कवित्वबुद्धीचा देखील परधर्माची प्रौढी गाण्यांत उपयोग करूं लागले, आणि अशा लोकांच्या साह्यामुळेंच परधर्माचें घोडें हिंदुस्थानच्या पटांगणांवर "थै थै" नाचत खिंकाळूं लागलें. म्हणूनच अशा प्रकारची मदत आपणास विनायकापासून पुढें मागें होणारच होणार अशी पाद्र्यांस जबर आशा सुटली. तो आतां आपल्या कंपूंत पक्का आल्यामुळें कितीही त्यानें वायदे केले तरी परत आपोआपच येऊन आपणांस मिळेल अशी त्यांची बालंबाल खात्री होती, आणि विनायकानें होईल तेवढें आपलें कार्य साधून घेण्याचा निश्चय केला होता. त्याला आणखी कोणाचाच आधार नव्हता.

विनायक आईला चक्रपुरांतच ठेवून मिशनऱ्यांबरोबर निघून गेला, ही बातमी बहुतेक सर्वांस समजली. सुंदरला त्यामुळें अतिशय वाईट वाटलें. त्यानें त्याला एकवार त्यांच्यांतून फोडून बाहेर आणलें होतें. पण त्याच्यापेक्षां त्याला आणखी कांहींच करणें शक्य नव्हतें. तरीही त्यानें त्याच्या घरीं जाऊन त्याचा पत्ता वगैरे मिळेल कीं काय याचा त्याच्या आईपाशीं शोध केला. पण थोड्या दिव-

सांनीं येऊन ' मी तुला घेऊन जाईन ' असें सांगून गेल्याचें त्याच्या आईकडून सुंदरला कळलें. तेव्हां त्याची विनायकाच्या भेटीविषयीं निराशाच झाली. त्याला त्याशिवाय दुसरें आश्चर्य वाटत होतें, तें हें, कीं गोविंद त्याच्याशीं सलगी करून व त्याचा विश्वास संपादून त्याचा दोस्त बनूं लागला होता. सुंदरला एका अर्थी वाटे, कीं आपल्या साधुवृत्तीच्या आचरणाचाच हा परिणाम आहे. म्हणून तो त्याच्याशीं आनंदानें व मोकळ्या मनानें वागूं लागला. परंतु "दुष्ट मनुष्याची मैत्री देखील दुष्परिणामकारकच असते" असेंही त्यास वाटे; पण त्याचा विचार गोविंद भेटल्यानंतर टिकत नसे. शत्रू जर वश होत असेल तर त्याच्याशीं सलोख्यानें वागणेंच बरें, असा त्यानें निश्चय केला होता व आपल्या वागणुकीनें आपण त्याला देखील वळवूं अशी त्यास धमक वाटूं लागली होती; गोविंद, रोज रोज आपल्या ऑफिस रूममधून सुंदरच्या ऑफिसच्या खोलींत येई. सवडीच्या वेळीं दोघेही गप्पागोष्टी करीत. परंतु सुंदरला एकाद्या प्रसंगीं गोविंदाच्या मैत्रीची धास्तीही वाटे.

शिवाय आपण अण्णासाहेबांच्या घरचे वार बंद केल्यापासून व अण्णासाहेबांची दोन चार वेळां गांठ पडली असून एका शब्दानें देखील आपणास कां विचारलें नाहीं हेंही त्याला एक कोडेंच होतें. ते बोलले तर नाहींतच पण आपणास पाहण्याबरोबर ज्यांचा चेहरा आनंदानें, सहानुभूतीनें प्रफुल्लित व्हावा त्यांच्याच कपाळास आपल्या दर्शनानें आंठ्या पडल्याचें देखील त्यानें अनेक वेळां पाहिलें होतें. या गोष्टीचा त्यानें व त्याच्या आईनें बरेच वेळां विचार केला होता, पण त्यांना कांहीं कारण समजून आलें नाहीं.

आज त्याची आई तापानें जरा अधिक आजारी असल्यामुळें त्यास ऑफिसमधून रजा घेऊन लवकर घरीं जावयाचें होतें, म्हणून तो आपलें काम लवकर लवकर आटपण्याच्या घाईत होता. इतक्यांत पोस्टमननें एक दिलेलें त्याच्या नांवचें पत्र घेऊन दरवाजावरचा शिपाई आंत आला व पत्र त्याच्या टेबलावर ठेवून गेला. सुंदरनें लिफाफा फोडला व अगोदर पत्र कोणाचें हें समजण्याकरितां खालची सही पाहिली. तों तें विनायकाचें पत्र होतें. त्यानें उत्सुकतेनें वाचण्यास सुरुवात केली.

श्री

प्रियमित्र सुंदर यांस,

सप्रेम नमस्कार वि. वि.

मी खूप दिवसांनीं पत्र पाठविलें आहे म्हणून तुला आश्चर्य वाटेल. पण आपल्या

कर्मांची कटकट दुसऱ्याच्या मागें लावून तुझ्यासारख्या आपल्याच चिंतेंत व्यग्र असणाऱ्याच्या मनास अधिक संत्रस्त करावें कसें ? असें मला वाटत होतें. पण तुझें माझ्यावर जें प्रेम आहे तें इतकें लवचीक नसून उलट तें माझ्याविषयीं तुला काळजींत लोटून माझ्याविषयीं तुझ्या मनांत राग आणील असें वाटून शेवटीं मी पत्र पाठवीत आहें.

माझें इकडे ठीक चाललें आहे. निघतांना मी तुला भेटावयाला आलों होतों. त्या वेळीं तुझा किंचित् डोळा लागला होता. नाइलाजास्तव मी तेथून उठलों. तुला डोळेभर पाहून घेऊन कांहींएक बोलल्याशिवाय मी निघालों. तूं आजारी पडल्यानंतर ती चांडाळचौकडी माझ्या पुरतीच पिच्छास लागली. माझी कुरापत काढून मला भांडणांत गुंतवण्याकरितां त्यांनीं प्रयत्न केला. त्यांनीं मला शक्य तेवढा त्रास दिला. शेवटीं मी अनेक प्रकारच्या अडचणींस व असल्या त्रासांस कंटाळून कोणासही न कळवितां मिशनऱ्यांबरोबर इकडे आलों. तुला कळविण्याकरितां त्यांचें मला अझूनही टुमणें लागलेलें आहेच. हे म्हणे माणसाला ईश्वराची भेट करून देण्याकरितां त्यास बाप्तिस्मा देतात. जसें कांहीं इतर कोणत्याही धर्मांतल्या सच्छील माणसास ईश्वराची भेट न होतां ती फक्त मिशनऱ्यांच्या रदबदलीनेंच होणें शक्य आहे ! हें मला सर्व कांहीं कळतें, पण करणार काय ? तूं मला वारंवार जो उपदेश करीत होतास तो डोळ्यांसमोर ठेवून मी आतां पर्यंत दिवस कंठले; पण आतां अधिक दिवस घालवितां येणार नाहींत. मी लवकरच बाप्तिस्मा घेऊन प्रभूच्या दरबारीं जाण्याची वाट खुली करणार. व मग मात्र मी तुझी भेट घेण्याचें धाडस करणार नाहीं. तत्पूर्वी तुला एकवार भेटावेंसें वाटतें, पण ती इच्छा पुरी होईलशी वाटत नाहीं. तुझी हकीगत मला कळली आहे. मी तुझ्याविषयीं अनेक प्रकारें चौकशी काढीत असतों. आणि ह्मणूनच गोविंद व त्याच्या पक्षाची मंडळी यांच्यापासून फारच सावध ऐस. ते तुझ्यावर केव्हां कसला प्रसंग आणतील याचा नेम नाहीं. मला पुष्कळ पुष्कळ लिहावेंसें वाटतें. पण कसें लिहावें हें कळत नाहीं. जर ह्या पत्राचें उत्तर पाठविलेंस तर मी तुला बाप्तिस्मा घेतला तरी पुढची हकीगत कळवीन. जास्त काय लिहूं ? लोभ ठेवावा हे औपचारिक शब्द कांहीं मी तुला लिहावयास नकोत.

तुझा गरीब स्नेही,

विनायक.

सुंदरनें तें पत्र वाचलें व घडी करून पुन्हा जशाचें तसें पाकिटांत घालून तें खिशांत घातलें. व त्या दिवशींच्या कामाची आटपाआटप करून तो जावयास निघाला, त्यानें शिल्लक मोजली. आंकडयाचा हिशेब व रोख शिल्लक रकम पुनः पुन्हां; पुनः पुन्हां मोजून ताडून पाहिल्या व त्या बंद करून ठेवणार इतक्यांत गोविंद आंत आला.

"कसं काय, आज तुला पत्र कोणाचं आलं आहे ?" गोविंदानें विचारलें.

"आहे खासगी." टाळाटाळ करीत सुंदर म्हणाला.

"खासगी कुणाचें बुवा ? मला नाहीं खासगीपणाचा संभव दिसत ?" गोविंदानें पुन्हा म्हटलें.

"आहे झालें कुणाचें तरी" मनांतला भाव बाहेर न दाखवितां सुंदरनें उत्तर दिलें.

"पण कोणाचें सांग ना ?" लोंचटपणानें त्याच्या टेबलाच्या जवळ जाऊन गोविंदानें विचारलें.

"सांगतों मग ! जरा थांब. मला ह्या वेळीं फार घाई आहे" असें म्हणून त्याला टाळण्याकरितां शेजारच्या खोलीकडे लवकर जाण्याची परवानगी घेण्या-करितां झटकन् कोट चढवून सुंदर गेला.

त्याची पाठ फिरतांच "खासगी पत्रें हल्लीं येऊं लागलीं काय चोरा तुला हल्लीं ?" असें म्हणून त्यानें दांत चावले. व सुंदरच्या टेबलाकडे कांहीं वेळ उभा राहून तोही लगेच त्याच्या पाठोपाठ निघून गेला.

सुंदर परवानगी घेऊन परत फिरतो, तों गोविंद सुंदरच्या खोलींतून आपल्या खोलीकडे जातांना दिसला. सुंदरला आपल्या मागची ब्याद टळली एकदांची असें वाटून टेबलांतील रोकड व नोटी कुलुपांत ठेवून निघून गेला.

तो जात असतां गोविंद आपल्या खोलीच्या खिडकींतून त्याच्याकडे स्मित-युक्त चेहऱ्यानें, परंतु भयंकर विचारांच्या कल्पनेमुळें एक प्रकारच्या चमत्कारिक मुद्रेनें त्याच्याकडे सारखा तो दिसेनासा होईपर्यंत पहात होता.

प्रकरण दहावें.

आशेची निराशा !

ज्या दिवशीं विनायकाचें पत्र आलें होतें, त्याच दिवशीं सुंदरनें ऑफिसांतून रजा घेतली होती हें सांगितलें आहेच. ती रात्र गेली. दुसऱ्या दिवशीं देखील, रमाबाईच्या प्रकृतीचें मान बरें न होतां अधिकच वाढलेलें दिसूं लागलें. रोज प्रातःकाळीं उठून शौचमुखमार्जन आटोपून प्रातःस्मरण म्हणत नमस्कार घालणें, दंड काढणें व बैठका मारणें वगैरे रोजचा व्यायामाचा विधि आटोपल्यावर घरांतलें कामधाम त्यास करावें लागलें. तदनंतर संध्या व पूजाविधि यथासांग आटोपली. नंतर सैंपाक वगैरे झाल्यावर वैद्याकडचें औषध आणण्यास तो गेला. अजून वैद्याच्या कानांवर साधा आजारीपणा असेल म्हणून त्यानें गोष्ट घातली नव्हती व त्यास फुरसतही नव्हती. आतां दादासाहेबांस कळल्यावर त्यांनीं ताबडतोब व्यवस्था केली असती, परंतु अगोदरच उपकारांच्या भाराखालीं लवलेला सुंदर आणखी नवीन नवीन गाऱ्हाणीं त्यांस सांगावयास तयार होईना. ह्मणून आपणच शक्य तितकी खटपट करण्याचा त्यानें उद्योग आरंभिला. वैद्याकडचें औषध दिल्यावर तिचें डोकें, पाय वगैरे चेपून परत संध्याकाळची तयारी करून ठेवीपर्यंत त्यास किती तरी वेळ लागला. म्हणून कपडे करून तो आणखी दोन दिवसांची रजा घेण्याकरितां ह्मणून ऑफिसकडे निघाला.

पण ऑफिसला जाण्यापूर्वी दादासाहेबांच्या बंगल्यावरून जावें असें त्यास वाटलें. कारण दादासाहेब व हेडमास्तरसाहेब, तसेंच अण्णासाहेब यांच्या पुढारीपणाखालीं चक्रपूर शहराच्या नागरिकांतर्फे अनाथ विद्यार्थिफंड नांवाचा एक फंड जमत असून त्यांतून चांगल्या होतकरू व हुषार विद्यार्थ्यांस नोकरीस ठेवून अथवा अन्य प्रकारें मदत करून व ज्यांना नोकरी करणें देखील झेंपण्यासारखें नसेल त्यास पुस्तकें कपडे वगैरे पुरवून परधर्मापासून परावृत्त करण्याचा व शिक्षणाच्या कामीं साहाय्य करण्याचा उद्देश साधण्याकरितां प्रयत्न होत असून तो बराच जुळत आला असल्याचें त्यानें ऐकलें होतें. विनायकासारखीं कितीतरी गरीब मुलें बाटत होतीं. याकरितां चक्रपूरच्या शहरवासियांनीं आपल्या धर्माच्या गरीब मुलांस सहाय करण्याचें मनांत आणल्याबरोबर त्यांस बऱ्याच लोकांचा पाठिंबा मिळाला, व अनाथ विद्यार्थि फंड अस्तित्वांत आला. त्यानंतर हेडमास्तरनीं व

खुद्द दादासाहेबांनींही विनायकाबद्दल सुंदरकडे माहिती विचारली होती. पण त्याला त्याबद्दल कांहीं ठाऊकच नव्हतें, तर तो माहिती कुठली देणार ? त्या नंतर पुन्हा एकवार तो विनायकाच्या आईकडे जाऊन आला; तथापि त्याला नक्की असें कांहींच समजलें नाहीं. त्यानंतर त्यास मागच्या प्रकरणांत सांगितलेलें पत्र आलें. म्हणून विनायकाची माहिती दादासाहेबांस व हेडमास्तरांस वगैरे देऊन त्याला ऐन वेळेवर मदत देतां येईल तर किती उत्तम होईल असें मनांत येऊन त्याच विचारांच्या जोरांत तो दादासाहेबांकडे जाऊन पोंचला.

ऑफिसची वेळ असतां सुंदर मध्येंच कसा आला असें वाटून त्यांनीं त्याच्या येण्याचें कारण विचारलें. सुंदरनें आपणास विनायकाचें पत्र आल्याचें कळवून त्यांतील हकीगत इत्थंभूत निवेदन केली. दादासाहेबांनीं त्याला ताबडतोब मिशनऱ्यांच्या कँपमधून निघून येण्यास कळविण्याविषयीं पत्र लिहिण्यास सांगितलें व ऑफिसमध्यें आज गेला होतास कीं नाहीं ह्मणून विचारलें. त्यावर सुंदरनें आपल्या आईच्या आजारीपणाची हकीगत सांगून आपला आणखी चार दिवस रजा घेण्याचा हेतू कळविला. दादासाहेबांना सुंदरला पाहिल्याबरोबर एक प्रकारचा आनंद वाटे. अण्णासाहेबांखेरीज त्याच्याविषयीं प्रतिकूल ग्रह कोणाचाच झालेला नव्हता. हेडमास्तर तर आठवण होई त्या त्या वेळीं त्याची तारीफच करीत असत. आज देखील दादासाहेबांस सुंदरला पाहून असाच आनंद झाला. आपला अवाढव्य कारखाना व आपला नांवलौकिक पुढें कायम चालवील तर सुंदरच, असें त्यांस सुंदरला पाहतांक्षणीं वाटे. दादासाहेबांस एक लहान सात आठ वर्षांची मुलगी होती. त्यांना मुलगा नव्हता. अर्थात् उतार वयाच्या दादासाहेबांस आपल्या व्यापारविषयक सर्व महत्त्वाकांक्षा सुंदरच्या भावी कर्तबगारींत सांठवल्या आहेत असें दिसे. मात्र हा मनांतला हेतू त्यांनीं कधींच कोणास कळविला नव्हता. त्यांनीं सुंदरला विचारलें—

"तुझा हल्लीं अभ्यास कसा काय चालला आहे ?"

"आहे जेमतेम कसा तरी. सध्यां मला वेळच मिळत नाहीं, आईच्या आजारीपणापासून." सुंदर ह्मणाला.

परंतु सुंदरला विचारून न थांबतां दादासाहेब हेडमास्तरांकडे देखील सुंदरच्या अभ्यासाची चौकशी करीत. सुंदर यंदा मॅट्रिक पास होईल अशी हेडमास्तरांस पक्की खात्री होती.

"मॅट्रिक पास झाल्यावर पुढें तूं काय करणार ?" मुद्दामच दादासाहेबांनीं सुंदरला विचारलें.

" काय करणार मी ? मला पुष्कळ करावेंसें वाटतें. पण—"

" कां ? पण काय— ?"

पण काय–तें सुंदर काय सांगणार ? त्याच्या मनांत पुष्कळ अडचणी येत होत्या. पुढें काय करणार याचा त्यानें आतांपर्यंत फारसा विचारच केला नव्हता. दादासाहेबांच्या या आकस्मिक प्रश्नानें तो गोंधळून गेला. पण प्रथमच त्याच्या तोंडून सहजस्फूर्तीनें शब्द आले ते "मला पुष्कळ करावेंसें वाटतें" असेच. पुष्कळ तें काय, असें कोणी विचारल्यास त्याला कांहींच सांगतां आलें नसतें.

" पास झाल्यावर तुला जपानांत किंवा अमेरिकेंत पाठविला तर धंदेशिक्षण संपादन करून येशील काय ?" असा त्याच्याकडे तीक्ष्ण दृष्टीनें व बारकाईनें पहात दादासाहेबांनीं प्रश्न केला.

" हो, हो," सुंदरनें एकदम उत्तर दिलें. त्या दोन देशांच्या नांवाच्या उच्चाराबरोबरच त्याचे डोळे चमकले व चेहऱ्यावर हास्य उमटून चेहरा एकदम प्रफुल्लित झाला. क्षणार्धांत तेथल्या तेथें उभा असतांनाच तो कल्पनेच्या जोरावर जपानांत व अमेरिकेंत शिरला देखील. जपान देशाचा व अमेरिकेचा नकाशा त्याच्या डोळ्यांसमोर उभा राहिला. त्या देशांतील लोकांचीं, संपन्नतेचीं, बऱ्या वाईट रीतिरिवाजांचीं, कलाकौशल्यांचीं, कारागिरीचीं व धंद्या कारखान्यांचीं वर्णनें त्यानें आतांपर्यंत कितीतरी वाचलीं होतीं. तीं सर्व त्यास आठवलीं. त्या विचारमग्न स्थितींत सुंदरला पाहून दादासाहेबांनीं म्हटलें–

" तोंडानें हो हो म्हटलेंस, पण त्याबरोबर इतक्या कसल्या गूढ विचारांत गढून गेलास ?"

वास्तविक पहातां तो विचारांत गढला होता जपान अमेरिकेच्याच ! पण दादासाहेबांनीं " विचारांत कसल्या गढून गेलास ? " असें विचारतां क्षणींच त्यास खरोखरच एक विचार आठवला, व त्यामुळें तत्क्षणींच त्याचा आनंदी चेहरा उतरला. आपल्या प्रश्नानें घडवून आणलेला फरक दादासाहेबांनीं तेव्हांच पाहिला. त्यांनीं विचारलें—

" तुला परदेशांत जाण्याची भीति का वाटली ? "

" नाहीं."

" तर तुझा चेहरा कां उतरला ? "

सुंदरच्या दोन डोळ्यांत दोन अश्रु उभे राहिले. " मी परदेशांत कलाकौशल्य अथवा उद्योगधंद्यांचें शिक्षण घेण्याकरितां आनंदानें जाईन. पण—"

पुढें त्याच्यानें एकदम बोलवेना. दादासाहेबांच्या मनांत खरोखरच जर आपणास परदेशांत पाठविण्याचें असेल तर ते मला मित्रा म्हणतील काय ? म्हणून तो क्षणभर सावध राहिला. पण पुन्हा दादासाहेबांनीं तोच प्रश्न विचारल्यावर तो म्हणाला—" मी जाईन. पण माझ्या आईची कोण काळजी घेईल ? " हे शब्द संपतांच ते दोन्ही अश्रू त्याच्या गालांवरून खालीं उतरले. जपान अमेरिकेचा नकाशा जाऊन अंथरुणावर पडलेल्या आईची मूर्ती त्या मातृभक्त सुंदरच्या नजरेसमोर आली होती. आपल्या उत्तरानें दादासाहेबांस राग येतो कीं काय हें पहाण्याकरितां त्यानें चटकन् डोळे पुसले.

"हात्तिच्या ! एवढंचना ? तूं परदेशांत जाण्याला तयारच असशील तर तुला आपल्या आईची काडीइतकीहि काळजी करावी लागणार नाहीं. "

" तर मग मी खात्रीनेंच जाईन." हे शब्द उच्चारतांना त्याचे चेहऱ्यावर भावी आशेचें व वैभवाचें तेज चमकलेलें दादासाहेबांस दिसलें. दादासाहेब त्याचें हें उत्तर ऐकून फारच खूष झाले. ते म्हणाले—

" तर मग तुला पास होतांच लवकरच परदेशांत पाठविण्यांत येईल. पण तूं अगोदर इथल्या ऑफिसमधलें काम कसें काय करतोस तें पाहिलें पाहिजे. तूं आतां अगोदर त्या पुरंदरे डॉक्टरकडे जाऊन आईला औषध सुरू कर. तिची मुळींच हयगय करूं नकोस. जा."

तुझें ऑफिसमधलें काम पाहिलें पाहिजे, असें जरी वरवर दादासाहेबांनीं म्हटलें होतें, तरी त्याच्या कुशाग्र बुद्धीची त्यांना केव्हांच खात्री पटली होती. कारण खजीन्याच्या खात्यांत त्याला नेमून चार दिवस झाले नाहींत तोंच त्यानें आपलें काम चोख सांभाळण्यास सुरुवात केली होती व याबद्दलची त्यांनीं प्रत्यक्ष व त्याच्या हेडक्लार्ककडून खात्री करून घेतली होती. हा प्रश्न त्यांनीं आपला सहजगत्याच मुद्दाम विचारला होता. पण पुढें त्याच प्रश्नाला महत्त्व प्राप्त झालें. तथापि पुढचें एव्हां कशाला ?

सुंदर तेथून निसटला तो अगोदर पुरंदरे डॉक्टरकडे गेला. पुरंदरे डॉक्टरनींच त्याला मागें बरा केला होता. त्यांनीं त्याच्या आईस औषध सुरू करण्याचें कबूल करून तिला लवकरच बरी करण्याचें आश्वासनही दिलें. एकंदरींत आजचे सर्वच प्रसंग सुंदरला आनंदाचे आले. सुंदरला आपला भाग्योदय होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. डॉक्टरकडून तो घाईघाईनें तडक ऑफिसमध्यें गेला.

ऑफिसमध्यें गेल्याबरोबर त्यानें प्रथम विनायकास पत्र लिहिलें. त्यांत त्यानें दादासाहेबांपाशीं झालेल्या आपल्या बहुतेक संभाषणाची विशेषतः विनायकासंबंधींची हकीगत लिहिली व चक्रपुरांत स्थापन झालेल्या अनाथ विद्यार्थिफंडाची, त्याच्या उद्देशांची, नियमांची, खजीनदार, व्यवस्थापक, चिटणीस, अध्यक्ष वगैरे मंडळीची साग्र माहिती लिहिली होती. तें पत्र पुरें झाल्यावर त्यानें आपला आदल्या दिवशींचा हिशेब पाहिला व त्या दिवशींचे कामास सुरुवात केली. त्या दिवशींचें काम करण्यास त्यास आतां वेळ नव्हता. पण लवकर लवकर त्या दिवशींचें काम आटोपून त्यानें हिशेब केला तों त्यांत तफावत दिसूं लागली. म्हणून पुन्हा लगबगीनें पाहिलें, तरीही तोच प्रकार. मग त्यानें लक्ष लावून दोन्ही दिवसांचें काम तपासलें, तरी तफावत होती ती कायमच. शिल्लक पुनःपुन्हा चार पांच वेळ मोजून पाहिली, तरी रक्कम कुठें गेली समजेना. तफावतीची रक्कम थोडी थोडकी नसून चारशें रुपयांची होती. त्यानें लेखी हिशेब निरनिराळा करून पाहिला, तेव्हां त्यास आदल्या दिवसाच्या रकमेंतच ती तफावत पडली असल्याचें आढळून आलें, आणि आदल्या दिवशीं तर त्यानें काम चोख करून ठेवलें होतें, याबद्दल त्यास बिलकूल शंका नव्हती. त्याचा चेहरा खर्रकन् उतरला. महिन्याचा शेवटचा दिवस संपून पहिली तारीख दुसऱ्या दिवशींच होणार असल्यामुळें चालू महिन्याचा हिशेब देण्याचें काम आटोपून तो चार दिवस रजा घेणार होता ! परंतु हें मधेंच कोणतें संकट ओढवलें असें त्यास झालें ! चारशें रुपयांची तूट ! आणि आतां ही कशी भरून काढणार ? त्याला कांहीं समजेना ! एकदम आंग गारठल्यासारखें होऊन दुसऱ्याच क्षणीं अंगांतून ज्वाला निघताहेत असा त्यास भास झाला. डोळ्यांपुढें काजवे चमकले. अंगांतून दरदरून घाम सुटला, आणि त्यानें खुर्चीवर मटकन् बसून आपल्या कपाळास हात लावला.

परंतु असा बसून तरी तो किती वेळ काढणार होता ? घरीं आई वाट पहात बसली असेल. आईची आठवण होतांच तर त्यास रडूंच कोसळलें. शेवटीं त्यास

हेडक्लार्ककडे हिशेब देणें व रजा घेणें तर अवश्यच होतें. परंतु आतां आपल्यावर चोरीचा आरोप येईल कीं काय अशी त्यास भीति वाटली. पण तेवढ्यांतही त्यास दादासाहेबांच्या दयालुतेचा धीर आला. निराशेंतली आशा ती ! बुडतां बुडतां निराश झालेला माणूस काडीला धरूनही तरून जाण्याची आशा बाळगतो. दादासाहेबांचें आजपर्यंतचें आपल्यावरचें प्रेम, आजचें त्यांचें आश्वासन, वगैरे गोष्टींवर हवाला ठेवून त्यानें तितक्या वेळे पुरतें समाधान करून घेतलें, व हेडक्लार्ककडे कागद घेऊन जाण्यास तो निघाला. त्यानें सर्व हकीगत हेडक्लार्कच्या नजरेस आपण होऊनच आणून दिली. परंतु हिशेबाच्या कामांत शब्दांच्या प्रामाणिकपणाला कोण विचारतो ? सुंदरवर असलेली दादासाहेबांची बहालमर्जी कधीं खप्पा होईल याची सर्वांबरोबर तो देखील आतुरतेनें वाट पहात होता ! त्यानें अर्थात् गंभीर मुद्रा करून ह्मटलें—

" पहा बुवा ! चारशें रुपयांची भरपाई कशी ती करून द्या ! आणि मग आपले रजेवर चला ! आह्मांला नका आणखी त्यांत गुंतवूं. "

सुंदरला त्रिभुवन आठवलें. तो चारशें रुपये भरणार कुठून ? ते काय त्याच्या खिशांत त्यानें ठेवले होते. ह्या वेळेला त्या चारशें रुपयांच्या नोटा एका खिशांतच होत्या, पण सुंदरच्या कोटाच्या खिशांत मात्र नव्हते ! सुंदर खालीं मान घालून मागें परतला व आपल्या खोलींत येऊन डोळे पुशीत, त्यानें मघां लिहिलेलें विनायकाचें पत्र काढलें. त्यांत आणखी ही एक नवीन घडलेली आकस्मिक गोष्ट लिहून आपल्यावर आतां चोरीचा आळ येण्याचा कसा संभव आहेआणि तो आला तर आपली कशी दुर्दशा होईल हें देखील त्यानें त्या पत्रांत लिहिलें. नंतर तें बंद करून त्यावर तिकीट लावून तो आपलें काम आटोपून बाहेर पडला. तो बाहेर पडल्यावर लगेच हेडक्लार्कनें हळुहळू ती गोष्ट आपल्या शेजारच्या कारकुनास सांगितली, आणि एकापासून दुसऱ्याला, अशा रितीनें हां हां ह्मणतां सुंदरनें चारशें रुपयांची अफरातफर केल्याचा एका तासाच्या आंत सर्व ऑफिसभर बभ्रा होऊन गेला.

सुंदर पोस्टांत पत्र टाकण्यास जडपावलांनीं चालला होता. काळोख पडण्याचा वेळ होत आला होता. तो एक रस्ता ओलांडून दुसऱ्या रस्त्यावर जाणार होता, त्याच ठिकाणीं दोन तीन असामी कोणी बोलत येत असल्याचें त्यानें ऐकलें. तें ऐकण्यास तो थांबला नाहीं. पण ते शब्द असे होतेः—

"तूंच जा पुढें. मी मागें राहतों."

"असें काय करतोस भितऱ्या भागूबाईसारखा ? इथें काय कोणाची चोरी करावयाची आहे थोडीच. आपल्याला फक्त व्यवहार करावयाचा, त्याला लाज कशाला इतकी ? अस हो पुढें पुरुषासारखा !" असें म्हणून कोणींसें एकानें दुसऱ्यास ढकललें. त्या धडक्याबरोबर दामू जड पावलांनीं परंतु झपाट्यानें चालणाऱ्या सुंदरच्या पुढें आला. त्याला पाहून दामू लवकर लवकर पुढें निसटला. पुढें पाहतो तों हरी व गणू !

सुंदर त्यांच्याकडे नजर देखील न देतां अथवा एक अक्षरही न बोलतां निमूटपणें आपल्याच विचारांत पुढें सरकला. त्याला पाहतांक्षणींच हरी व गणू यांच्या कपाळास आंठ्या पडल्या व त्यांनीं एकमेकांकडे पाहून जिभा चावल्या. हे त्यांचे हावभाव दामूच्या नजरेस पडले नाहींत. नाहीं तर त्यास त्यांचा तेव्हांच संशय आला असता व जें पुरुषासारखें मर्दुमकीचें काम करण्यास त्यानें नामुष्किलीनें पुढाकार घेतला होता तें तसेंच गणूच्या व हरीच्या आंगावर टाकून, त्यानें आपल्या घरचा रस्ता सुधारला असता.

प्रकरण अकरावें.

हा काळ आला !

दामू पुढें सरकला तो झटक्यासरसा चकपूरच्या सराफ बाजारच्या रस्त्यानें चालला. निरनिराळ्या प्रकारच्या लांकडी, लोखंडी व पितळेच्या फर्निचरानें व निरनिराळ्या धातूंच्या व कांचेच्या दिव्यांनीं सजविलेल्या एका भव्य दुकानांत तो जाऊन उभा राहिला. त्याच्याबरोबर गणू होता पण तो दुकानापर्यंत आला नव्हता. तो मागें मागें रेंगाळत होता. हरी तर बऱ्याच अंतरापर्यंत दिसत नव्हता. त्या दुकानापासून फार लांब रस्त्यांत तो एका स्नेह्याशीं बोलण्यांत गढून गेला होता. बाजारच्या एका टोकाला हें दुकान होतें. दुकानांत सारा माल स्वदेशी दिसत होता. खरोखरच अशा प्रकारचा माल परदेशी मालाशीं कोणत्याही बाबतींत कमी नसून विशेष टिकाऊ असलेला पाहून कोणाही देशभक्तास धन्यता वाटली असती. दुकानांत गिऱ्हाइकांचीही पुष्कळ गर्दी होती. परंतु प्रथम प्रथम जो कोणी येई तो माल पाही, दराची चौकशी करी व परत माघारा

फिरून पलीकडल्या दुकानांतला एकादा, आस्ट्रिया, जर्मनी अगर जपानांत बनविलेला दिवा विकत घेऊन निघून जाई. देशी दिवा व परदेशी दिवा यांच्या किंमतींत थोडाफार फरक होता ही गोष्ट कबूल. देशी दिवा किंचित् किंमतीनें महाग पडे. पण तेवढ्यासाठींच थोड्याशा काटकसरीकरितां सुंदर देशी माल सोडून परदेशी माल विकत घेणें व आपला पैसा आपल्या हातानें दुसऱ्यांच्या खिशांत घालणें कितपत योग्य आहे बरें ? तशांतही गरीबगुरीबांनीं असें केलें तरी एकवार क्षम्य होईल. कारण त्यांच्या मासिक वेतनांत त्यांचा शहरचा खर्च देखील भागण्यास मारामार पडते. वास्तविक गरीबगुरीबांचें देखील हें करणें क्षम्य होणार नाहीं. कां कीं, हेच लोक, विडीतंबाकू, पानसुपारी, नाटकें, सिनेमा यांच्याकरितां स्वतःच्या शरीराचे व कुटुंबाचे देखील हाल करून पैसे खर्च करतात. मग एखाद्या देशी वस्तूकरितां गेलेले चारदोन आणे जास्त कां वाटावे ? तसेंच आपलें तेवढें सगळें वाईट व दुसऱ्याचें तें चांगलें असेंच ज्यांस दिसतें, म्हणजे अर्थात् जे स्वतःला—स्वत्वाला कायम विसरून गेले आहेत, त्यांना वगळलें गेलें तरीसुद्धां जे आपल्या देशाच्या उन्नतीकरितां मोठमोठीं लेक्चरें झोडतात व सुभाषितें सांगतात, त्यांनीं देखील अशाच प्रकारें वागावें म्हणजे देशाचें दुर्दैव नाहींतर काय ? सिनेमाच्या थिएटरांत, लग्नमुंजीसारख्या उत्सवाच्या मंडपांत अगर दारूच्या गुत्त्यांत वगैरे जर कोणी एकादा परदेशचा माणूस आला तर त्याला हिंदुस्थान दरिद्री आहे ही चाललेली ओरड अगदीं खोटी आहे असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. स्वदेशी माल चांगला नसतो, तो महागही असतो. नव्हे देशी मालाचे व्यापारी फसवे व लुबाडणारे असतात वगैरे जे कांहीं आक्षेप आहेत ते सर्व खरे मानून चालूं. पण त्याच्यापूर्वी माझ्या तरुण वाचकांना मला एक गोष्ट विचारावयाची आहे. समजा तुमची एक बहीण आहे. ती नुकतीच सैंपाक करावयास शिकत आहे, व तिनें आपल्या जिवाची आटापीट करून जेवण अगर फराळाचे जिन्नस तयार केले. पण समजा, कीं त्यांत कांहीं वैगुण्य राहिलें. उत्तम सुग्रण अथवा घाणेरड्या हॉटेलांतला कसलेला आचारी तेच जिन्नस जितके खुमासदार करूं शकेल तितके तुमच्या बहिणीस करतां आले नाहींत. तिनें सामानाला एका रुपयाच्या ऐवजीं दीड रुपया खर्च केला असेल, त्या सामानाची नासधूसही केली असेल, अथवा दादा मीं तुला वाढलें ना ? आतां मला विणण्याकरितां थोडीशी लोकर आणून दे, असें जर म्हटलें तर

तुम्ही, आज तिला नाहीं करितां आलें तर दुसरे खेपेस चांगलें करील असें म्हणून तिची वाहवाच करीत ते जिन्नस खाल, का शेजारच्या घरीं अथवा एकाद्या बाजारांतील दुकानांत जाल ? सांगा बरें ? दुकानांत जर पैसे घेऊन जाणार असाल तर तुम्हाला अंतःकरणेंच नाहींत—तुम्ही माणूसच नव्हेत—असेंच म्हटलें पाहिजे. आपल्या हिंदुस्थानची अशीच स्थिती आहे. प्रथम प्रथम आपल्या दुर्व्यसनांत, ऐष आरामांत, चैनबाजींत जो पैसा खर्च करितां त्याची काटकसर करून देशी मालाला कौतुकानें घेण्यांत उत्साह दाखविला पाहिजे. नाहींतर पिढयानुपिढया तुम्हाला परक्यांवरच तरी अवलंबून राहिलें पाहिजे.

वरील दुकानांतल्या मालाची गोष्ट कांहीं निराळी होती. जरी बरेंचसें गिऱ्हाईक प्रथम प्रथम परतून जाई तरी देखील नंतर जास्त प्रमाणावर माल तयार व्हावयास लागून परदेशीच्याच किंमतीनें तो विकावयास काढल्याबरोबर त्यास फार मागणी येऊं लागली.

ह्याच दुकानांत दामू गेला व त्यानें एक दिवा मागितला.

हिकच्या दिव्यासारखा परंतु त्याहूनही जास्त कौशल्य खर्च केलेला असा एक सुंदर दिवा त्यास दाखविण्यांत आला. त्यानें तो आरखून पारखून पाहिला. त्यास पसंत पडला. त्यानें त्याची किंमत विचारली. किंमत त्याला पावणे नऊ रुपये सांगण्यांत आली. किंमत कमी जास्ती करण्याकरितां दामूनें घासाघीस केली नाहीं. त्यानें एक नोट काढली आणि व्यापाऱ्याच्या नोकराचे हातावर ठेवली. नोकराला अत्यंत आश्चर्य वाटलें. त्यानें ती नोट आपल्या मालकाच्या समोर ठेवली. मालक तक्क्याला टेंकून बसले होते. त्यांनीं आपली पेटी उघडली. पण तत्पूर्वी त्यांनीं आश्चर्यानें त्या नोटीकडे पाहिलें. "काय घेतलें यांनीं ?" त्यांनीं आपल्या नोकराला विचारलें. हा प्रश्न विचारतांना, ते आपल्या नोकराकडे न पाहतां दामूकडे रोंखून पाहत होते.

"एक दिवा !" नोकरानें उत्तर दिलें.

"किती किंमतीचा ?"

"पावणे नऊ रुपये."

शेटजींनीं त्या नोटीकडे व दामूकडे पुन्हा भेदक दृष्टीनें पाहिलें व त्यांनीं दामूला जवळ बसावयास सांगितलें. दामू बसण्यास कबूल होईना. कारण मागून

गणू त्याला झटपट येण्यास शीळ घालीत होता. परंतु शेटजींनीं फारच आग्रह केल्यामुळें दामू जवळ बसला.

"तुम्हांला मी पूर्वी कोठें तरी पाहिल्यासारखें वाटतें ?" शेटजी पेटी बंद करीत म्हणाले.

"कोणाला मला ?" दामूनें आश्चर्यानें विचारलें.

"तुह्मालाच. पण कुठें बरें ?" शेटजी मिशांवरून ओठावर उजव्या हाताची करांगुळी फिरवीत विचार करीत म्हणाले.

"आमच्या शाळेंत तुह्मी बक्षीस समारंभाकरितां वगैरे आलां असाल !"

"थांबा हां ! तुम्हांला किंवा तुमच्या वडलांना. त्यांच्यासारखाच तुमचा चेहरा असेल. पण तुमचे वडील कुठें असतात !"

"दादासाहेबांच्या कारखान्यांत. चिटणीस."

"आतां बरोबर. त्यांनाच मी ओळखतों. शिवरामपंत दामले त्यांचें नांव नव्हे ?"

"होय होय !" दामू मान हालवीत ह्मणाला.

"त्यांनींच तुमच्याकडे ही नोट दिली काय ?"

दामू इथें मात्र उत्तर देण्यास घोंटाळला. त्यानें चट्कन् होय म्हटलें. पण पुन्हा ह्मणाला.

"नाहीं ! नाहीं."

"तर मग कोणी ?" शेटजींनीं पूर्वीपेक्षांही शांतपणानें विचारलें.

"त्या गणूनें." दामू अडखळत अडखळत मागें पहात म्हणाला. हीं प्रश्नोत्तरें होई तों शेटजींनीं पुन्हा पेटी उघडून ती नोट मागून पुढून उलथी पालथी करून लक्षपूर्वक पाहून घेतली व पुन्हा पेटी बंद केली. ह्या त्यांच्या करण्यानें दामूचा जीव खालींवर होत होता. तो ह्मणाला.—

"द्या लवकर बाकीचे पैसे. मला जाऊं द्या."

"पण गणूकडची नोट तुमच्याकडे कशी आली ?" शेटजीनीं विचारलें.

"तो गणू तिथें बोलत आहे आपल्या स्नेह्याबरोबर. मला त्यानें दिवा घेण्याकरितां पुढें पाठवलें."

" गणू ह्मणजे त्या भाऊराव वकिलांचा मुलगा ना ?"

" होय, तोच."

" मग त्याला जरा बोलवा ना ?"

दामूनें मोठ्या कष्टानें उठून गणूस हांक मारून बोलाविलें.

गणूनें येण्याचें नाकारिलें, पण शेटजींनीं तर फारच आग्रह धरिला. तिकडे हरी जवळ जवळ येत गणूला बोलावीत होताच. तथापि दामूनें जेव्हां दुकानांत घडलेली हकीगत गणूस सांगितली तेव्हां तो आपला जोडा फडफडावीत व हातांतली काठी गिरकावीत मोठ्या ऐटीनें दुकानांत आला व बाहेरून उभ्यानेंच म्हणाला—

" कां ? कशाला बोलाविलेंत हो मला ? "

" एरवींच. जरा बसा ना ! तुमची देशी मालावर भक्ति दिसते. दुकानांतला माल घ्यायचा आणि दुकानांत पाऊल देखील टाकावयाचें नाहीं, असें कां बरें ?"

" थँक यू ! पण मला एव्हां सवड नाहीं. मग केव्हां तरी येऊं. दामू, घे बघूं दिवा आणि ते पैसे. " हें पुढचें वाक्य दामूस उद्देशून त्यानें ह्मटलें व आला तसाच जोरांत निघून जाऊं लागला.

शेटजींनीं नोकराकडे पाहून डोळे मिचकावले व मोठ्यानें गणपतला ह्मणाले, " अहो रावजी ! हा दिवा घेऊन जा. पण ही नोट आपणाला वडिलांनींच दिली काय ? "

" तुह्माला विचारण्याची जरूर ? " असें शेटजींस विचारून नंतर त्यानें दामूस म्हटलें. "बस्स. ठेव त्यांचा दिवा. आम्हाला नाहीं घ्यायचा येथला भिकारडा महाग दिवा. आम्ही दुसऱ्या दुकानांत घेऊं डिट्मारचा टेबल लँप. घे बरं ती नोट आणि चल लवकर ! "

शेटजींनीं नोट घडी करून दामूच्या हातांत दिली व ते जावयास फिरल्याबरोबर त्यांनी कागदावर कायसें टिपून ठेवलें. गणू व दामू दृष्टीच्या आड होण्यापूर्वीं आपल्या मुलास त्यांनीं हाक मारली. त्याबरोबर गोपाळ धांवत आला.

" गोपाळ ! गोपाळ. ते दोघे मुलगे जाताहेत ते–ते तुझ्या ओळखीचे आहेत काय ? "

"माझ्या परिचयाचे कांहीं नाहींत, पण ते आमच्याच शाळेंतले वरच्या वर्गांतले विद्यार्थी असावेत. विनायकाबरोबर मी त्यांना पूर्वी बरेच वेळां पाहिलें आहे." इतकें तो बोलत असतां ते दोघे दिसेनासे होणार तोंच त्यांत तिसरा एक येऊन मिळाला असल्याचें त्यानें पाहिलें. तिघांसही त्यानें शाळेंत पाहिलें होतें.

इकडे ते तिघेही रस्त्यानें चालले असतां हरीला गणूनें दुकानांत झालेली कथा सांगितली आणि ते दोघेही दामूला सारखे बोचूं लागले. दामूनें सारा घोंटाळा केला व आतां पुढें केवढें तरी मोठें संकट येणार असल्याचें त्यांच्या बोलण्यावरून दामूनें ताडलें. पण त्याला त्याचा कांहींच अर्थ कळेना. दामूला ती नोट स्वतःची आहे असें सांगण्यास दोघांनींही बजाविलें होतें. दामूनेंही कदाचित् खोटें बोलून, ती आपलीच म्हणून सांगितली असल्याचें गणूस सांगितलें असतें; पण शेटजींच्या प्रश्नावरून सर्व उलगडा झाला होता. तेव्हां भोळ्या दामूस कुठेंच लपण्यास वाव नव्हता. शेवटीं दोघांच्या गुरकावणीस व धमक्यांस तो त्रासून ह्मणाला--

"मग काय झालें मी खरें तें सांगितलें म्हणून? तुझी नव्हे ती नोट? नसेल तर दे मला!"

"मोठा आला आहे शहाणा नोट मागायला? माझी ती असेल अगर नसेल. पण तुला शिकविल्याच्या बाहेर तूं कां बोललास?"

"यावरून तुझा मला संशय येतो आहे. तुझी कांहीं तरी लबाडी असली पाहिजे यांत!" मनांत भीति वाटत असतांही दामू उसन्या बळानें म्हणाला.

"चूप बस चोरा! तुझे कधींच बारा वाजले असते त्या सुंद्र्याला हाणमार केल्याबद्दल! आम्ही म्हणून तुझा अजूनपर्यंत बचाव केला आहे. स्वतः असलीं हलकट कृत्यें करून पुन्हा चोरा दुसऱ्यांस लबाड ह्मणतोस काय?" गणूनें जरबीच्या शब्दांनीं चापल्याबरोबर दामू विरमला. त्याला कळून चुकलें, कीं आपला पक्ष खरा असला तरी ह्या दुष्ट लोकांना बिथरवून उपयोग नाहीं. कारण तशापासून आपला निभाव लागणार नाहीं. त्या अर्थी आपण तात्पुरती तरी पडती बाजू घ्यावी. तो गयांवयां करून ह्मणाला, "खरें बाबा. तुझेंच खरें. माझी चूक मी कबूल करतों. मग तर झालें कीं नाहीं. पण तूं माझ्यावर रागावूं नकोस."

" अस्सा ये जरा शुद्धीवर ! बहकतोस काय दारू प्याल्यासारखा. " इतके शब्द बोलून झाल्यावर हरीनें गणूचा हात दाबला. त्याबरोबर गणपत म्हणाला,

" दामोदर अण्णा ! ही आपली गंमत हं ! नाहीं तर तुम्ही आपले खरोखरच समजाल मी तुमच्यावर रागावलों म्हणून ! "

आतां कुठें दामूचा जीव खालीं आला. काळोख पडूं लागला म्हणून दामू घरीं गेला. हरी व गणू हरीच्या घरीं चालले. हरी खोली उघडतो तों बाहेर सोटा वाजल्याचा आवाज आला. इतक्यांत रामागड्यानें दाराबाहेरच्या बाजूस आंब्याचे झाडाखालीं कोणी माणूस हरीस बोलावितो आहे म्हणून सांगितलें. हरीचे बारा वाजले !

हरी व गणू एकमेकांकडे टकमक पाहूं लागले. खरोखरच आंब्याच्या झाडाखालीं काळाकुट्ट, भला धिप्पाड व काळोखाच्या योगानें ज्याचा देह किती तरी पटीनें मोठा दिसत आहे असा, हातांत सोटा घेतलेला व डोक्यास मुंडासें बांधल्यासारखा एक दांडगट दिसला !

" अरे बाबा ! आतां याला काय द्यावें ? हा आला काळ ! " असे उद्गार हरीच्या तोंडून बाहेर पडले.

प्रकरण बारावें.

नको होतें तेंच झालें !

सुंदर घाईघाईनें घराकडचें काम आटोपीत होता. त्याला दादासाहेबांकडे हजर होण्याकरितां हुकूम आल्यावरून फार घाई उडून गेली होती. त्यानें बहुतेक सर्व काम आटोपलें. आईस काय हवें नको तें विचारून घेतलें व देवास नमस्कार करून अंतःकरणांत अगदीं घाबरून गेलेला सुंदर दादासाहेबांकडे जावयास निघाला. कोठेंही कामाउद्योगास बाहेर पडतांना देवास नमस्कार करून निघण्याचा त्याचा नेहमींचा परिपाठ असे. आज तर त्याचें काळीज धडधडत होतें. कारण रजा घेण्याच्याच दिवशीं जी अद्दल घडली त्याचा परिणाम काय होतो कुणास ठाऊक अशी भीति त्यास वाटत होती. आपला चारी

बाजूंनीं पडता काळ असल्यामुळें सर्व बाजू आपल्याच आंगावर शेकणार असें त्याचें मन त्यास सांगत होतें. बाकी कोणीतरी प्रतिपक्षीय दुष्टानें आपला डाव साधण्याकरितांच हें कुभांड रचलें आहे हेंही त्याला पक्कें माहीत होतें. परंतु जें काय होईल तें सहन करणेंच त्याला प्राप्त होतें. आज आपलें नशीब आपणास कोणता भोग भोगावयास लावतें हें त्यास पहाणें होतें. बाहेर पडतांना तो ईश्वरास स्मरून असे शब्द पुटपुटलाः—

" परमेश्वरा, जर आज कांहीं माझ्यावर वाईट प्रसंग येणार असेल तर मला शिक्षा करण्यापूर्वी माझ्या ह्या आईची स्थिति लक्ष्यांत आण, आणि देवा, तिच्या करितां तरी मला संकटांत गुंतवूं नको. बाकी आम्हां सर्वांची काळजी घेणारा तूंच आहेस. मला हव्या त्या शरीरयातना दे; पण कसला तरी किळसवाणा आरोप माझ्यावर आणून माझ्या नांवाला काळिमा लागेल असें कांहीं घडूं देऊं नको. देवा मी तुला अनन्य शरण आहें. आजन्म माझ्या हातून तुझी आणि आईची सेवा घडूं दे."

इतकें ह्मणून तो बाहेर पडला. मनांतून तो देवाचा धांवा करीत होता. पुढें आपणास दादासाहेबांच्या तोंडून काय ऐकावयास मिळणार इकडे त्याचें लक्ष गुंतलें होतें. जड पावलांनीं तर्कवितर्क करीत तो चालला होता. दादासाहेबांच्या बंगल्यावर नवीन स्थापन झालेल्या अनाथ विद्यार्थी सहायकारी फंडाचे व्यवस्थेसंबंधाच्याच कामाचा कांहीं शेलकी मंडळी जमून विचार करीत होती. ऑफिसांत चारशें रुपयांची सुंदरनें अफरातफर केली ही बातमी हळुहळू दादासाहेबांपर्यंत येऊन धडकली. त्यांचा प्रथम या अफवेवर विश्वास बसेना. त्यांनीं स्वतः कागद पाहून खातरी करून घेतली तरी देखील सुंदरच्या हातून असलें नीच कृत्य घडेल हें त्यांस संभवनीय वाटेना. निदान त्याच्या हातून असलें कृत्य घडलेलें आपल्या कानीं येऊं नये अशी त्यांची फार फार इच्छा होती. त्यांनीं त्यास आपलें विश्वासपात्र म्हणून शोधून काढलें होतें. आपली मानसिक निवड इतकी फसणार नाहीं असेंही त्यांस क्षणोक्षणीं वाटे. परंतु व्यवहाराच्या कामांत सचोटीच असली पाहिजे. ज्याला आपण पुढें व्यवहाराचा मुख्य आधारस्तंभ बनविणार तो जर असल्या बुद्धीचा माणूस निघाला तर ही गोष्ट देवानें लवकर आपल्या नजरेस आणली हे आपल्यावर त्याचे अगणित उपकार झाले असें त्यांनीं मानलें. आज हॉलमध्यें त्यांची सहायकारी मंडळी बसलेलीच होती.

त्यांच्यासमक्ष सुंदरला विचारून, त्याच्याबद्दल काय तो निकाल करून टाकावयाचें त्यांनीं ठरविलें आणि त्यांनीं सुंदरला बोलावणें पाठविलें होतें. एकंदरींत झाल्या गोष्टीबद्दल त्यांस फार वाईट वाटत होतें. त्यांना निश्चयात्मक असें कांहींच ठरवितां येईना. परंतु थोड्याच वेळांत जेव्हां सुंदर येऊन पोंचला, तेव्हां ती त्याची निरपराधी, निर्विकार मुद्रा पहातांक्षणींच तर तो केवळ निरपराधी असून त्याला शिक्षा करण्यांत आपण परमेश्वराच्या घरीं गुन्हेगार ठरत आहों असें देखील त्यांना एकवार वाटलें. त्यांच्या, त्याच्याबद्दलच्या पूर्वीच्या कल्पना जागृत झाल्या. परंतु घडलेला प्रकार तितकाच खरा होता, आणि त्याविषयीं सुंदरशिवाय वहीम घेण्यास इतर कोठेंच जागा नव्हती. तेव्हां कोणी झालें तरी करणार काय?

सुंदरनेंच चोरी केली असावी असें कोणीही तिऱ्हाइतानें सांगितलें असतें. कारण सुंदर गरीब मुलगा. त्याला नेहमींच पैशाची निकड. अशा स्थितींत त्याच्या हातांत रोकड रकमा घोळत असलेल्या. तेव्हां त्यास त्यांतली रक्कम ठेवण्याचा मोह होणें साहजिक आहे, असेंच सर्वांस वाटलें. शिवाय दादासाहेबांस जर यदाकदाचित् संशय आलाच तर त्यांची खात्री करावयास अण्णासाहेब एका पायावर तयार होतेच.

शेवटीं एकदांचें सुंदरला खुद्द दादासाहेबांनींच विचारलें--"ऑफिसमध्यें चारशें रुपयांची जी अफरातफर झाली ती तुझ्या हातूनच झाली आहे. सर्व लोक तसेंच म्हणतात. प्रत्यक्ष वह्या पाहिल्या असतां तसेंच स्पष्ट दिसत आहे. तुला चांगल्या मार्गास लावावा, तुझें शिक्षण पुरें व्हावें, इतकेंच नव्हे तर माझ्या मनांतला हेतू देखील मी आतां इतक्यांसमक्ष बोलून दाखवितों, कीं तुझें वय, गुण, रूप व हुषारी पाहून, तुला पुढें चांगलेंच नांवालौकिकास चढवावें अशा हेतूनें मी तुला मदत करावयास आरंभ केला. तुला जर कशाची उणीव पडली होती तर तूं प्रत्यक्ष मला सांगावयाचें होतेंस. हा सिधा मार्ग सोडून चोरीचा हा निंद्य मार्ग तूं कां पत्करलास? चोरी कोणास पचल्याचें तूं कधीं तरी पाहिलें आहेस काय? सांग! तूंही चोरी केलीस कीं नाहीं?"

इतकें बोलून ते सुंदर काय उत्तर देतो हें पहाण्याकरितां उगी राहिले. हेडमास्तरसाहेब त्या सभेंत हजर होते. ते सुंदरच्या पक्षाचे होते. त्यांच्या बाजूस पुरावा मुळींच नव्हता. फक्त आपल्या अनुभवावरूनच ते मघांपासून तेथील मंड-

ळीस सांगत होते, कीं सुंदर निर्दोषी आहे. पण प्रत्यक्ष पुराव्याशिवाय कोणाच्या बोलण्यास कोण महत्त्व देतो?

सुंदर दादासाहेबांचें बोलणें खालीं मान घालून ऐकत स्वस्थ उभा होता. त्याला जें नको होतें तेंच पुढें वाढून आलें. असला घाणेरडा आरोप आपल्यावर येऊं नये ह्मणून तो देवास गाऱ्हाणीं घालीत होता. कितीही भयंकर संकट आलें असतें तरी त्यास वाईट वाटलें नसतें. संकटें भोगण्याकरितांच देवानें आपणास जन्मास घातलें आहे असें तो समजे. तीं भोगून भोगून तो त्यांत घट्टून गेला होता. ह्मणून त्यास संकटांची विशेषशी पर्वा वाटेनाशी झाली होती. परंतु ज्याच्या योगानें कलंक लागेल असा कोणताही प्रसंग आपल्यावर येऊं नये अशी त्याची इच्छा होती. अशा तऱ्हेचा हा त्याच्यावर आज पहिलाच आरोप येत होता. त्याअर्थी या प्रसंगीं त्याला मरणप्राय दुःख होणें साहजिकच होतें सगळीच हकीगत जर खोटी होती तर तो उत्तर तरी काय देणार? आणि त्यानें आरोप नाकारला तरी जोंपर्यंत त्यास आपलें ह्मणणें शाबित करून दाखवितां येत नाहीं तोंपर्यंत त्याच्या नाकारण्यास विचारणार कोण? गुन्हा कोणीही नाकारणारच! अर्थात् हा देखील एक दैवाचा तडाखा आपणास मुकाट्यानें सहन करावा लागणार असें समजून तो स्तब्ध उभा राहिला. तो बोलत नाहींसें पाहून हेडमास्तरनीं ह्मटलें,—

"सुंदर, आजपर्यंतच्या तुझ्या वागणुकीवरून तूं हें असलें ओंगळ कृत्य केलें असशील असें मला वाटत नाहीं. परंतु ही माझ्या मनाची समजूत. एकंदर गोष्टी तुझ्या विरुद्ध आहेत. परंतु ईश्वरास साक्ष ठेवून खरी हकीगत काय आहे हें तूं सांगशील काय?"

हेडमास्तरांच्या तोंडचे हे शब्द ऐकून आपल्या पक्षाचा इथें एक तरी माणूस आहे असें सुंदरला वाटून जरा त्यास धीर आला. आपल्या तर्फे एक अक्षरही न बोलतां होणारें शासन निमूटपणें सहन करण्याचा त्यानें निश्चय बदलला आणि खालीलप्रमाणें स्पष्ट जबाब दिला.

"चारशें रुपयांची अफरातफर झाली, ही गोष्ट तर उघडच आहे. पण मी मात्र परमेश्वरास स्मरून इतकेंच सांगूं शकतों, कीं त्यांतली एक कपर्दिक देखील मी उचलली नाहीं. त्या रकमेची मी स्वप्नांत देखील इच्छा धरली नव्हती;

इतकेंच नव्हे तर ही रकम गहाळ झाली ती देखील मला त्या दिवशीं नव्हे तर दुसऱ्या दिवशीं कळून आलें. दुसऱ्या दिवशीं शिलकी जमेंत आणि कागदावरील आंकड्यांत फरक पडूं लागला; तेव्हां मी हिशेब तपासले, तों आदल्या दिवशींच्या रकमेंत घोंटाळा झाला असल्याचें माझ्या नजरेस आलें. आणि आदल्या दिवशीं तर मी हिशेब अगदीं बरोबर करून ठेवलेला होता. तेव्हां खरा प्रकार काय आणि कसा घडला आहे हें त्या देवालाच ठाऊक! तथापि ज्या अर्थी माझ्या हातून ह्मणजे मी त्या जागेवर काम करीत असतांना ही गोष्ट घडली आहे त्या अर्थी मी सर्वथैव दोषास पात्र आहें. परंतु त्या रकमेपैकीं एका पैलाही मी शिवलों नाहीं किंवा तशी मी कधीं इच्छाही केली नाहीं. जास्त काय मी सांगूं?"

सुंदरचें अंतःकरण फोडून आलेले शब्द सर्वांस लागले. सुंदर निर्दोष आहे याबद्दल हेडमास्तरांस तर संशय नव्हताच. दादासाहेबांस थोडा बहुत होता. पण तो सुंदरच्या बाणेदार, व निर्भीड उत्तरानें पार मावळून गेला. परंतु अण्णासाहेबांचा संशय मात्र उलटा दुणावला. त्यांनीं आपला राग मघांपासून आवरून ठेवला होता. तो आतां त्यांनीं सगळा सुंदरच्या आंगावर काढला. एकदा एकादा माणूस एकाद्याच्या मनांतून उतरला, कीं तो सारखा डोळ्यांत खुपत राहतो. त्याचें दर्शन देखील त्याचें मस्तक फिरवितें. सुंदरबद्दल अण्णासाहेबांचा असाच पक्का ग्रह होऊन गेला होता, कीं सुंदर हा पक्का काफर आहे. ते ह्मणाले—

"बरें सुंदर, तूं आपण पैशास शिवलों नाहीं एवढें सांगून मोकळा झालास, पण त्या पैशाचें व्हावें काय, याचा तुझा तूंच निकाल करण्याचा प्रयत्न करून पहा बघूं?"

"तेंच तर मला समजत नाहीं. तेवढें मला करतां आलें असतें तर मी दोष पदरांत कशाला घेतला असता?"

त्यानें आपलें बोलणें निमूटपणें ऐकून न घेतां उत्तर केलेलें पाहून अण्णासाहेबांस फारच चीड आली!

"शिवाय चोरीचा मुद्दा बाजूला ठेवला, तरी ऑफिसच्या कामास या कृत्यामुळें तूं नालायक ठरतोस."

"मी कामांत कधींही कोणत्याही प्रकारची कुचराई केली नाहीं. माझ्या अभ्यासाकडे क्षणभर दुर्लक्ष केलें असेल, आईच्या आजारीपणाकडे देखील या कामाकरितां मी दुर्लक्ष केलें असेल पण ऑफिसच्या कामाकडे मीं दुर्लक्ष केलें नाहीं. रकमेची अफरातफर झालेली लक्षांत येतांच मी प्रथम ताबडतोब जाऊन हेडक्लार्क यांच्या नजरेस ही गोष्ट आणून दिली. माझें मन निर्मळ आहे. मी निष्पाप आहें. माझ्यावर हवे तसले आरोप येवोत."

सुंदर अगदीं जिवावर उदार होऊन हीं अक्षरें बोलत होता. ऐकणाऱ्यांच्या मनावर त्यांचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. पण अण्णासाहेबांची स्थिति उलट झाली. त्यांच्या मनांत आजपर्यंत खुदखुदत राहिलेली गोष्ट त्यांनीं आज बाहेर काढून सर्वांची खात्री करण्याचा निश्चय केला. दादासाहेबांस हीच गोष्ट न सांगतां, पण याच गोष्टीच्या संशयावरून सुंदरच्या विरुद्ध त्यांचें मन वळविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला होता.

"कोणत्याही माणसाच्या हातून घडलेल्या गुन्ह्याविषयीं जेव्हां संशय येतो तेव्हां त्याची मागची वर्तणूक विचारांत घ्यावी लागते. त्यांत जर तसाच एकादा अपराध झालेला बाहेर आला, तर नवा गुन्हा नवीन पुरावा नसला तरी आपोआपच शाबीत होतो, ही गोष्ट कबूल आहे ना?" अण्णासाहेब सुंदरला परंतु वास्तविक सर्व सभासदांना उद्देशून म्हणाले.

"कबूल!" असे शब्द हेडमास्तर उत्तरले.

सुंदरलाही आपल्या वर्तनाची खात्री असल्यामुळें अण्णासाहेबांच्या न्याय निवडण्याचे या पद्धतीचा त्याला आनंदच झाला.

दादासाहेबांना देखील या गूढाचा कसा काय निकाल होतो तो पहावयाचा असल्यामुळें, ते सारखें लक्ष देऊन घडणारा प्रकार पाहत व ऐकत होते. पण त्यांचें मन सुंदरकडे झुकत होतें.

"तर मग मागें एका रविवारीं मी तुला आमच्या घरीं दुपारीं सुमारें साडे अकरा वाजतां आल्यावेळीं मधुकरी बरोबरच एक लाडू दिलेला आठवतो काय?"

सुंदरला ती गोष्ट आठवली. पण त्या लाडवाचा आणि आजच्या चोरीचा संबंध काय हें त्याच्या लक्षांत आलें नाहीं. तो शांतपणानें म्हणाला, "होय आठवतो. आपण मला एक लाडू दिला होता खरा. आणि—"

" चूप—विचारल्यापेक्षां जास्त उत्तर द्यावयाचें नाहीं. " अण्णासाहेब त्याच्या फाजील बोलण्यावर–त्यांस तें फाजीलपणाचेंच वाटलें–रागावून म्हणाले. "मी विचारीन तेवढयाच प्रश्नांचीं उत्तरें दे. त्यानंतर तूं आमच्याकडे मधुकरीला यावयाचें कां बंद केलेंस ? "

" तुमचा हुकूम म्हणून. "

" काय माझा हुकूम ? मी तुला येऊं नको असें कधीं सांगितलें होतें ? "

" मला हरीनें तसें कळविलें. हरी म्हणाला, कीं आजपासून अण्णासाहेबांनीं तुला आमच्या घरीं यावयाचा बंद केला आहे म्हणून. " सुंदरनें उत्तर दिलें.

" मग मला तूं कधीं असें स्पष्ट विचारलें नाहींस तें ? "

" माझा कांहीं अपराध नसतां मला तुम्हीं एकदम बंदी केलीत आणि तीही हरीकडून. तेव्हां मीही एक दिवस उपाशींच रहाण्याचा निश्चय करून स्वस्थ बसलों. अद्भूनही मला त्याचें कारण कळलेलें नाहीं. " सुंदरनें जबाब दिला.

" मी बंदी केली ही गोष्ट अगोदर खोटी आहे. तथापि मी पुढें मात्र तसें करणार होतों खरेंच. आणि त्याचें कारणही आतां बाहेर पडेलच. त्या लाड-वाच्या सभोंवतीं गुंडाळलेल्या कागदांतून तुला कांहीं वस्तु मिळाली काय ?" अण्णासाहेबांनीं विचारलें.

" नाहीं. कांहीं नाहीं. " आश्चर्य करीत सुंदर उद्गारला.

" कांहीं नाहीं ? तर मग तूं थोड्याच दिवसांनीं त्या मिशनऱ्यांच्या कँपमध्यें चालला होतास तो कशाकरितां ? " अण्णासाहेबांनीं प्रश्न केला.

" मला–माझ्या आईला एक पांच रुपयांची नोट सांपडली आणि अगदीं त्याच सुमारास विनायकाप्रमाणें मलाही आपल्या ज्ञाळ्यांत अडकविण्याच्या हेतूनें मदत करण्याकरितां म्हणून मिशनऱ्यांचा एक माणूस आला होता. आम्ही त्याचा एक पैसा देखील घेतला नाहीं. पण तोच ते पैसे टाकून गेला असावा असें वाटून मी ते देण्याकरितां चाललों होतों." सुंदरनें उत्तर दिलें.

" अस्सें काय ? बरं ती नोट आतां कुठें आहे ? " अण्णांनीं विचारलें.

" मला मार बसला त्याच दिवशीं ती नाहींशी झाली. मी शुद्धीवर आलों तेव्हां प्रथम नोट पाहिली. मला ती खिशांत मिळाली नाहीं." सुंदर म्हणाला.

" सर्वच मजकूर खोटा ! चोरी एक वेळ पचेल, दोन वेळ पचेल, म्हणून चोरीवरच जन्म घालवीन म्हटलें तर तसें होणें शक्य नाहीं. ती पांच रुपयांची नोट तुझी परीक्षा पहाण्याकरितां मींच मुद्दाम लाडवाबरोबर कागदांत गुंडाळून दिली होती. ती तूं परत दिली नाहींस. पुढें मिशनऱ्यांशीं संधान बांधलेंस. अशीच दुसऱ्या कोणाची चोरी केली असलीस तर कोणी तरी तुला वाटेंत फटकावला असेल. पण आपलें आचरण सन्मार्गाचें असलें पाहिजे. पूर्वीच्या सचोटीच्या वर्तनावर एक दोन लबाड्या खपतात. पण सदोदित कसें चालेल ! वास्तविकपणें आज तुला पोलीसच्या ताब्यांतच दिला पाहिजे. पण तुझ्या त्या गरीब आईला ह्या आजारीपणांत अधिक यातना होतील, म्हणून कांहीं करतां येत नाहीं. तुला मात्र आतां अनाथविद्यार्थी सहाय्यक फंडाची मदत मिळणार नाहींच पण दादासाहेबांच्या ऑफिसांतील नोकरीसही मुकावें लागेल. चारशें रुपयांवरच आतां तूं पुढचें आयुष्य काढ ! "

अण्णासाहेबांचे हे शब्द सुंदरचें काळीज भेदून गेले. कोपाचा आणि त्वेषाचा अतिरेक झाल्यानंतर त्याच्यानें मुखांतून शब्द देखील काढवला नाहीं. सुंदरला निषेधपर असें पुष्कळ पुष्कळ बोलावयाचें होतें. पण संतापाचा-सात्विक संतापाचा—अतिरेक होऊन त्याचें मस्तक फिरलें. चक्कर आल्यासारखी होऊन तो मट्कन् खालीं बसला आणि बेशुद्ध झाला.

प्रकरण तेरावें.

संकटांचा कळस !

विनाकारण अंगावर चोरीची तोहमत आल्यामुळें मस्तकावर प्रहार झाल्यासारखें सुंदरला होऊन तो क्षणभर निश्चेष्ट झाला. अण्णासाहेबांनीं केलेल्या आरोपास दादासाहेबांनीं देखील आपली संमति दिली; आणि त्यांनीं दिलेला निकाल व शिक्षा ही देखील कायमच केली. याचें सुंदरला अतोनात वाईट वाटलें. इतकें सर्व दादासाहेबांनीं केलें तरी त्यांचें मन मात्र स्वस्थ झालें नव्हतें. सुंदरशिवाय दुसऱ्या कोणालाही गुन्हेगार धरण्यास येत नव्हतें. परंतु गुन्हेगार दुसराच कोणीतरी असला पाहिजे, असेंच मास्तरसाहेबांस व दादासाहेबांसही मनांतून वाटत होतें.

आणि सुंदरला जरी कामावरून दूर करून त्यास अनाथ करण्यांत आला, तरी खरा गुन्हेगार शोधून काढण्याचा उपाय दादासाहेबांनीं आंतून चालूच ठेवला होता. कारण चारशें रुपये जाणें ही बाब जरी क्षुल्लक दिसली तरी अशा प्रकारचा माणूस आपणाजवळ असणें हें घातकच होय असें त्यांस वाटत होतें.

सुंदर क्षणभरानें सावध झाला व घरीं येण्यास निघाला. खरोखर म्हटलें तर त्याला आतां घरीं जावेंसें वाटत नव्हतें. तथापि आई अतिशय आजारी होती; तिला एकटी टाकून राहणें त्याच्या जिवावर येत होतें. परंतु चोरीचा आरोप येऊन झालेलें काळें तोंड घेऊन आईच्या समोर कसें जावें हाही विचार त्याच्या मनांत आला.पण त्याच क्षणीं त्यास असें वाटे, कीं आपणावर जरी आरोप आलेला असला तरी खरोखर आपण चोरी केली नाहीं ना ? मग उगीच डोक्यांत राख घालून कां घ्यावी ? अंतःकरणानें आपण निर्मळ असलें म्हणजे झालें. होय; अंतःकरण निर्मळ असलें तर अंतकाळीं देखील सुख होईल. देवाच्या ठिकाणीं तो मनाचा निर्मळपणा उपयोगीं पडेल. देवाच्या दरबारांत निर्दोषीपणावांचून मनाची शांति प्राप्त होणार नाहीं. या साऱ्या गोष्टी खऱ्या. पण सध्यां आपणास आयुष्य काढावयाचें आहे तें लोकांतच. अर्थात् त्यांच्या दृष्टीकडे पाहूनच आपणास वागावयाचें असतें. आंत कांहीं कां असेना. पण लोकांचें मत चांगलें असलें म्हणजे झालें. आंतून शरीर कितीही घाणेरें असलें तरी कपड्यांनीं आणि अत्तरांनीं तें असें शोभवावयाचें, कीं लोकांस तें चांगलें वाटेल. आपण कितीही अमंगळ कृत्यें काळोखांत केलीं असलीं तरी हरकत नाहीं, पण लोकांच्या दृष्टीला पडणारें वर्तन चोख ठेवून त्यांच्याकडून वाहवा मिळविली कीं काम झालें ! लोकांनीं; निर्मळ, शुद्धाचरणी ठरविला तो अंतर्यामीं पापी, दुष्ट असला तरी चालतो, हा लोकरिवाज झाला. खरें पाहूं गेलें असतां अंतर्यामीं चांगला राहून लोकांकडूनही चांगुलपणा मिळविणारे भाग्यशाली प्राणी जगांत विरळा आणि असे असतील ते खरेच भाग्यवान्! पण हें भाग्य फारच थोड्यांच्या वांट्यास येतें. सुंदर मात्र आज लोकांच्या दृष्टीनें चोर ठरला होता. देवाच्या किंवा त्याच्या मनाच्या दृष्टीनें तो निष्पाप होता. आज त्याला नोकरी बंद झाली. शाळेंत गेला तर त्याला सर्व मुलें चोर या नांवानें संबोधून त्याची हुर्रेवडी करणार ! बाहेर कुठें गेला तरी " चारशें रुपये चोरणारा चोर तो हाच" असें म्हणून त्याच्याकडे बोट दाखविणार ! अशा

स्थितींत त्याचा निरपराधीपणा कुठें व कसा फळास येणार ? हे सारे विचार त्याच्या मनांत येऊन त्याला जीव नकोसा होऊन गेला. आई हयात नसती तर त्यानें आपल्या जीवाचा आजच अंत करून घेतला असता. ज्याकडे पाहून जीव घोटाळवयाचा असा आशेचा एकच तंतु त्यास उरला होता. तो म्हणजे त्याची आंथरुणावर पडून तळमळणारी आई. रमाबाईंची सुंदरनें प्राणापलीकडे जोपासना चालविली. पण त्यास यश येण्याचें चिन्ह दिसेना. तिचें दुखणें आस्ते आस्ते वाढूं लागलें. आतां तर डॉक्टरचें देखील औषध बंद होणार होतें. कारण थोरांच्या आश्रयानें माणसाची किंमत वाढते, तशी त्याच्या स्वतःच्या गुणांनीं ह्या जगांत वाढत नाहीं. आजकालच्या जगांत स्वतःच्या गुणांच्या जोरावर कोणी पुढें येऊं म्हणेल तर त्यास या बाबतींत वशिल्याशिवाय म्हणजे थोरांच्याच आश्रयाशिवाय हार खावी लागेल. सुंदरला, दादासाहेबांचा आश्रय सुटला आणि वर तो चोर म्हणून गणला गेला. तेव्हां आतां डॉक्टर वैद्य यांच्याकडून औषधपाणी मिळणें कठीणच होतें. या सर्व गोष्टींचा विचार करीत सुंदर घरीं आला. आईचा कण्हण्याचा आवाज त्याच्या कानांत पडला. घरावर त्याची नजर गेली. त्याबरोबर आतां या घरांत तरी आपणास रहावयास मिळेल, कीं नाहीं कोण जाणे, असें त्यास वाटलें. दादासाहेबांकडे घडलेली हकीगत आईस सांगण्याचा त्याला धीर होईना. परंतु आजपर्यंत त्यानें कोणतीही गोष्ट आईपासून लपवून ठेविली नव्हती. आजची देखील त्याला लपविण्याची नव्हती. परंतु आजारीपणानें तिच्या मनाची स्थिति अत्यंत नाजूक झाली होती आणि तशांत आपल्या एकुलत्या सदाचरणी मुलावर चोरीसारखा आलेला आरोप ऐकून तिचें अंतःकरण दुभंग झाल्यावांचून राहणार नाहीं हें त्याला पक्कें ठाऊक होतें. आपल्या मुलाचें चांगलें व्हावें, त्याची हुशारी पाहून लोकांनीं त्याची वाखाणणी करावी असें तिला किती तरी वाटे. त्याच्यावर असला आरोप आलेला ऐकणें तिला सहनच झालें नसतें. सुंदर दादासाहेबांकडे गेला आहे हें तिला ठाऊक होतें. आणि अकस्मात् सुंदरला बोलावला तो कांहीं तरी बऱ्या गोष्टीकरितांच बोलावला असेल अशी तिच्या मनाची समजूत झाली होती. तिला सुंदर केव्हां येऊन आपणास घडलेली हकीगत सांगतो असें झालें होतें. सुंदर आल्याची तिला चाहूल लागली. सुंदरनें दरवाजा उघडून औषध कितीसें शिल्लक उरलें आहे तें पाहिलें. औषध एक वेळ देण्याइतकेंच होतें. परंतु आईची स्थिति त्यास बिकटच दिसली !

तिला हल्लीं हल्लीं वारंवार ग्लानि येण्याची संवय पडली होती. आणि अशा ग्लानींतच एखाद्या वेळीं तिचें प्राणोत्क्रमण होईल असेंही एका वैद्यास म्हणतांना त्यानें ऐकलें होतें. परंतु त्याला जास्त निक्षून सुंदरनें विचारलें, तेव्हां तो म्हणाला, कीं हें चालू असलेलें औषध पोंचलें तर कसलीही काळजी करण्याचें कारण नाहीं. औषध तर बहुतेक संपलेलें होतेंच. ग्लानि येतेशी वाटल्याबरोबर सुंदरनें तें तिला देऊन टाकलें. पण नवीन आणण्यास बाहेर पडण्याचा त्याला धीर होईना. कारण त्याच्या नांवाचा बोभाटा गेल्या चार दिवसांत बराच होऊन गेला होता. आतां आणखी लोकांकडून शोभा करून घेण्यापेक्षां घरांतल्या घरांत मरण आलेलें बरें असें त्यानें स्वतःशींच ठरविलें. घरांत ये जा सुरू असतां सुंदर प्रथम आपण होऊन बोलत नाहींसें पाहून रमाबाईनींच आपण होऊन सुरुवात केली. त्यांनीं क्षीण आवाजांत "सुंदर" म्हणून मुलाला हांक मारली. सुंदर तर बोलण्याचें टाळीत होता. परंतु मारलेल्या हांकेस तर ओ दिलाच पाहिजे. त्यानें 'ओ' दिला. रमाबाईंना बोलण्याची देखील ताकद उरली नव्हती. शिवाय आपल्या दुखण्याचा भार आपल्याच कोंवळ्या पोरावर पडत आहे हें मनांत येऊन त्यांना फार वाईट वाटे. त्यापासून त्याच्या अभ्यासाला, धंद्याला वगैरे व्यत्यय तर येणारच, पण त्याचा त्याच्या शरीरावर देखील परिणाम होऊन तो पुढें मागें आजारी पडेल कीं काय, या चिंतेनें त्या अर्ध्या-अधिक झुरत होत्या. याचसाठीं होतां होईतों बराच त्रास त्या आपणच सोशीत. अगदींच नाइलाज झाल्यावर सुंदरला त्या हाक मारीत. पण सुंदर हा सांगकाम्या नव्हता. तो मोठा चाणाक्ष मुलगा होता. आईला काय व केव्हां हवें नको, तें त्याला तिनें सांगितल्याशिवायच समजे. तो स्वतःच, तिनें नको नको म्हटलें तरी, सर्व जिथल्यातिथें व ज्या वेळचें त्या वेळीं सर्व काम करी. यामुळें त्याचें शरीर अगदीं कृश बनलें होतें. आपलें रोजचें नैमित्तिक काम त्यानें सोडलें नव्हतें. देवाची पूजा त्यानें अखंड चालविली होती. शिवाय मातृसेवेंत तर त्याची अधिकच भर पडली होती. पास होण्याचा तर त्याचा दृढनिश्चय असल्यामुळें इतकेही श्रम करून तो अभ्यासास त्यांतल्यात्यांत थोडाबहुत वेळ काढीतच असे. आईनें हांक मारली. आतां ती दादासाहेबांकडे काय घडलें म्हणून विचारणार हें त्यानें ताडलें; व आतां तिच्याशीं आपण खरें बोलावें कीं खोटें बोलावें याबद्दल त्याला मोठा विचार पडला. आईपाशीं खोटें बोल-

ण्याचा त्याला हा पहिलाच प्रसंग आला होता. खरें सांगितलें, तर तिच्या मनाला धक्का बसल्याशिवाय राहणार नाहीं, याबद्दल त्याला शंकाच नव्हती. तथापि खोटें बोलण्यासुद्दी त्याचें मन तयार होईना. अशा दुहेरी पेंचांत तो सांपडला असतांच रमाबाईनीं ' दादासाहेबांकडे काय झालें ?' म्हणून विचारलें. हें देखील त्याला नको होतें तेंच झालें.

" कांहीं नाहीं विशेष, पण मी बाहेर गेल्यावर तुला झोंप लागली होती काय ? " टाळाटाळ करण्याकरितां सुंदरनें उलट प्रश्न केला.

" मला झोंप नाहीं लागली. पण तूं गेलास तिकडे काय झालें तें मला अगोदर सांग. माझ्यानें अधिक बोलवत नाहीं. " रमाबाई क्षीण आवाजांत म्हणाल्या.

आतां मात्र टाळाटाळ करून चालण्यासारखें नव्हतें. कांहीं तरी योग्य उत्तर आईला दिलेंच पाहिजे; असें जाणून सुंदर जवळ जाऊन म्हणाला—

" आई, पण तुला काय घडलें असावेंसें वाटतें ?"

" मला तर असें वाटतें, कीं तुझे आजपर्यंतचे श्रम फळास येण्याचा वेळ अगदीं जवळ आला आहे. माझ्या बाळाचें कल्याणच होत जाणार, माझ्याजवळ ये बैस बघूं–सुंदर–येरे. "

सुंदर तिच्या बिछान्यावर तिच्याजवळ बसला. तिनें मातृवात्सल्यानें आपला हात त्याच्या मुखावरून, नंतर त्याच्या मस्तकावरून, नंतर पाठीवरून फिरवून ती त्याच्याकडे टकमक पहात राहिली. तहान लागल्यावर पाणी शोषावें तशी ती डोळ्यांनीं सुंदरला पोटांत भरून घेत होती. जणूं काय हें शेवटचेंच दर्शन असून, यापुढें तिला त्याला पहावयासच मिळणार नव्हतें. तिचें तें पहाणें सुंदरला चमत्कारिकच वाटलें. तो जरा घाबरल्यासारखा झाला. त्याचा खोटें बोलण्याचा निश्चय डळमळूं लागला. त्याच्या डोळ्यांत पाण्याचें भरतें आलें ! तो कंठ भरून आला असतां म्हणालाः—

" आई ! अशी काय ग तूं बघतेस ? मला भीति वाटते."

" पण तूं मला अजून दादासाहेबांनीं तुला काय सांगितलं तें कळवलं नाहींस. माझ्या अपेक्षेप्रमाणें कांहीं चांगलें असतें तर कळविलेंच असतेंस. यावरून कांहीं तरी विपरीत घडलें असावें. सांग, तुला ते रागें भरले काय ? माझ्या आजारीपणामुळेंच तुझ्या कामांत कांहीं चूक घडली किंवा तुला आपल्या हपीसांत वेळेवर

हजर रहावयास मिळालें नाहीं ह्मणून तुला कोणी बोललें, कीं काय झालें-सांग ना? सांग. मला ऐकल्याशिवाय बरें वाटणार नाहीं."

"हो! असेंच कांहींसें झालें खरें." सुंदर अर्धवट शब्दांत बोलला.

"रागेंच भरले असतील तर तूं इतका म्लान झाला नसतास. तुझ्या तोंडावर तजेला नाहीं. तुझ्या मुखावर काळजीचें दडपण पडल्यासारखें दिसतें आहे. कोणती तरी गोष्ट तुझ्या मनाला डांचत आहे. मुला! माझ्याकडे लपवालपवी करूं नको. तूं आजपर्यंत केली नाहींस. माझी खात्री आहे, तुझ्या हातून केव्हांही अपकृत्य घडणार नाहीं. आणि ह्मणूनच सांगतें, कीं जोंपर्यंत तुझें वर्तन चोख आहे, तोंपर्यंत तुला उजळ माथ्यानें फिरण्यास कोणतीही हरकत नाहीं. पोटास मिळत नसलें, अंगावर चिरगूट नसलें किंवा ह्याच्याहूनही कांहीं हाल झाले तरी सुंदर, आपलें शील बिघडूं देऊं नकोस. तूं शील बिघडूं दिलेलें नाहींस. आणि द्यायचाही पण नाहींस. पण मी आपलें सांगून ठेवतें. तुला ठाऊक आहे ना? सहन करण्यास कठीण अशा भयंकर विपत्ति जेव्हां आपल्यावर कोसळतात, तेव्हांच खूणगांठ बांधून ठेवावी, कीं ईश्वरानें आपली परीक्षा पहाण्याकरितांच पाठविलेले हे दूत आहेत. ह्या विपत्तींत जर आपल्या शीलास डाग लागूं दिला नाहीं, तर त्याच्या मागोमाग ईश्वराची कृपा झाल्याशिवाय रहाणार नाहीं. कितीही भयंकर संकटें आलीं, तरी त्यांत निर्मळ वर्तन ठेवलें ह्मणजे तेवढयानेंच आपल्यावरचें काम संपत नाहीं. तर तशा प्रसंगीं धीर गळूं न देतां छातीनें संकटास तोंड देत राहिलें पाहिजे. तूं आतांपर्यंत हार गेला नाहींस. पुढेंही हेंच वर्तन ठेव. ईश्वर तुला चांगले दिवस दाखवील. देव तुझें कल्याण करील-" यापुढें रमाबाईचा गळा सद्गदित झाला. त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले. त्यांनीं सुंदरची मान आपल्या हातानें जवळ ओढली व ती आपल्या छातीवर ठेवली. तशाच पडल्या स्थितींत तिनें सुंदरचा एक मुका घेतला. तिचें बोलणें अगोदरपासूनच सुंदरला चमत्कारिक वाटत होतें आणि त्यांत ह्या आईच्या करण्यानें तो अधिकच भिऊन गेला. तो हुंदका देऊन म्हणाला—

"तूं आज अशी काय बोलतेस-'आपणाला' म्हणावयाच्या ऐवजीं 'तुला-तुला' काय म्हणतेस? आणि तुझे डोळे असे काय दिसतात हे? तूं मला अगदीं अशी जवळ जवळ कां घेतेस? असं काय तूं करतेस आई-?" सुंदर ओक्साबोक्शीं रडूं लागला.

" बाळ, रडूं नको. मला घोंटभर पाणी दे. माझा गळा बसला. मला अझून खूप बोलावयाचें आहे—"

" मग आतांच कसली घाई आहे ? सावकाश बोलेनास ? आतां अगदीं तूं स्वस्थ बस. बोलूं नको. " असें म्हणून सुंदर डोळे पुशीत उठला व त्यानें थोडें तापवून थंड केलेलें पाणी आईला आणून दिलें. रमाबाई दोन घोंट पाणी प्याल्या, व परत म्हणाल्या—

" मला आतां मागून बोलावयास वेळ आहे कुठें ? मी कसली आतां–" अर्ध्यावरच रमाबाईंनीं हे शब्द ठेवले. ओघांत त्या पुढें " दोन घटकांची सोबतीण " हेच शब्द बोलल्या असत्या; पण तितक्यांत त्यांची नजर सुंदरकडे गेली. सुंदर तिचे शब्द अगदीं अशा रीतीनें ऐकत होता, कीं जसा कांहीं त्यानें आपला जीव त्या शब्दांच्या उच्चारांवरच लोंबता ठेवला होता. त्यांनीं आपले शब्द सांवरले व ह्मणाल्या–

"मी बरी होईन असें मला वाटतें आहे. माझ्या बाळाचें सुख पाहीन अशी मला आशा आहे. पण माणसानें आपण घटकाभऱ्यानें मरणार असेंच नेहमीं धरून चालावें. आपण चिरंजीव असें मानून कधींही वागूं नये. आपण नेहमीं प्रत्येक काम करतांना, मी उद्यां मरणार असें समजूनच वागलें पाहिजे. मरणाची भीति, ईश्वराचें भय, पापाचें मिळणारें प्रायश्चित्त, ह्या गोष्टी डोळ्यांसमोर ठेवून जो वागेल त्याच्या हातून वाईट कृत्यें सहसा घडणार नाहींत. त्याचप्रमाणें गरीब, सालस माणसांशीं वर्तन प्रेमाचें ठेवावें. देवाच्या भक्तांची व साधुसंतांची थट्टा–मस्करी अथवा अपमान करूं नये. होतां होईल तों खरें बोलावें. अशा रीतीनेंच सुंदर, तूं वाग बरं, बाळ. आतां सांग बघूं काय तुला दादासाहेबांनीं सांगितलें तें ?"

रमाबाईनीं हृदयाशीं सुंदरला पुनरपिही धरलाच होता. गरगर फिरणारे डोळे त्यांनीं त्याच्याच तोंडाकडे लावले होते. सुंदर ह्मणाला––

"आई ! माझ्यावर चोरीचा आळ घातला ग ! माझ्यानें तुला सांगण्याचा धीर करवेना. पण मी मागें लपवून तरी कशाला ठेवूं ? तुझ्या पोटीं मी जन्म घेतला. ज्या देवाची मी पूजा करतों त्या महादेवाची शपथ घेऊन मी सांगतों, कीं मीं चोरी केली नाहीं. पण चारशें रुपयांचा हिशोब मात्र चुकतो आहे खरा.

त्या चारशें रुपयांच्या चोरीचा आरोप माझ्यावर कोणीतरी दुष्टानें आपण चोरी करून घातला. आणि मला कामावरून दूर केलें. मला त्याबद्दल वाईट वाटत नाहीं. पण माझ्या नांवाला हा विनाकारण कोणी डाग लावला. आतां मी काय रे देवा करूं–" असें ह्मणून सुंदर रडूं लागला.

" अंगांत विजेचा संचार होतो, तसा प्रकार होऊन रमाबाई एकदम उठून ताठ बसली. तिच्या डोळ्यांत चमत्कारिक तेज चमकलें. तें पाहून सुंदर रडें विसरून तिच्याकडे पहात राहिला. ती त्याच्याकडे वेड्यासारखी पहात ह्मणाली–

"काय? तुझ्यावर चोरीचा आरोप? तूं चोरी केली नसतांना तुझ्यावर चोरीचा आळ? येऊं दे. सुंदर तूं असा रडत बसूं नको. दोन दिवस खऱ्याचें खोटें झालें, तरी शेवटीं खरें असेल तें उघडकीस येईल. खऱ्याला भय नाहीं. सत्य मार्गानें चालणाऱ्याचा देव पाठीराखा आहे. तुझें कल्याण होईल. खोट्याचें खोटें होईल. चोरी करणाऱ्याला योग्य प्रायश्चित्त परमेश्वर देईल. इकडे ये."

असें ह्मणून सुंदरचे डोळे आईनें पुसले. व ती खालीं पडली. खालीं पडल्या बरोबर तिच्या अंगांत आलेली अद्भुत शक्तिही नाहींशी झाली व तिनें एकदम डोळे फिरवून ती निश्चेष्ट पडली.

सुंदरचें तिच्याकडे बराच वेळपर्यंत लक्ष नव्हतें.

थोडया वेळानें त्यानें तिच्याकडे पाहिलें, तों तिचे डोळे त्याला भयंकर दिसले. त्यानें तिला आई आई, ह्मणून मोठमोठ्यानें हांका मारून पाहिल्या. पण––

सुंदरनें आईच्या हृदयावर मस्तक ठेवून किंकाळी फोडली. त्यावेळीं सुमारें दोन तीन घटका रात्र झाली होती. ती किंकाळी घराच्या चारी भिंती ओलांडून दूरवर गेली. रात्रीच्या शांत समयीं त्या भयंकर किंकाळीनें–काळीज फोडून बाहेर पडलेल्या किंकाळीनें–आसपासचें वातावरण बऱ्याच लांबपर्यंत क्षुब्ध केलें.

प्रकरण चौदावें.

आत्महत्या.

बराच वेळ शोक केल्यानंतर सुंदर किंचित् देहभानावर आला. त्याला शुद्धीवर येण्याबरोबर कांहींच सुचेना. सर्व जग त्याला उजाड झालें होतें. अमुक एकाकडे जाऊन त्याची मदत मागेन, सल्ला विचारीन अथवा आपली व आपल्या

आईची हकीगत कळवीन म्हटल्यास त्यास तसें आतां एकही स्थळ उरलें नव्हतें. तथापि त्याच्या मनांत अगदीं पहिल्या प्रथम जो विचार आला तो असा, कीं निदान अशा दुर्धर प्रसंगीं डॉक्टर आपल्या इतर बाबींकडे लक्ष देणार नाहींत. तेव्हां आईची हकीगत कळविण्यास आपण प्रथम डॉक्टरकडेच जावें. अशा विचारानें तो बाहेर पडणार होता. पण आतां आईवर व घरावर नजर ठेवण्यास कोण आहे ? ही चिंता त्यास पडली. तो बाहेर पडे, तेव्हां घरांत आई वावरत असे. घरांत कोणी नसतांना बाहेर पडण्याचा हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें त्यास कसेंसेंच वाटूं लागलें. त्यानें निजलेल्या माणसासारख्या निश्चेष्ट पडलेल्या आपल्या आईकडे जातांना पुन्हा एकवार पाहिलें. त्याला आशेनें मागें खेंचलें आणि आईकडे आणलें. त्याच्या मनांत एक विचार आला. घरांत झटकन् जाऊन त्यानें कापूस शोधून काढला आणि आईच्या नाकावर धरला. पण तो हलला नाहीं. त्यानें तिचा हात पुन्हा हालवून पाहिला पण तो ज्या स्थितींत ठेवावा त्याच स्थितींत राहिला. त्याला पुन्हा हुंदका आला. आतां त्यानें या खेपेस यथेच्छ मूकरुदन केलें. त्याची समजूत करायला तरी तेथें कोण होतें ? आपलें आपणच रडावें आणि आपोआप रडें थांबेल तेव्हां आपली आपणच समजूत करावी. हाय ! हाय ! काय ही असहाय दशा ! हा हुंदका येऊन गेल्यावर त्यानें आपला पूर्व निश्चयच कायम केला. तो बाहेर पडणार तोंच पुन्हा मागें परतून त्यानें आईच्या नाकावर कापूस धरला. कापूस किंचित् हालल्यासारखा दिसला. व त्याला किंचित् आनंद झाल्यासारखा दिसला ! पण तेवढ्यांत दिवा गेला. घराचे दरवाजे, खिडक्या उघड्या होत्या आणि वारा सोसाट्याचा सुटला होता. त्यानें खिडक्या बंद करून घेतल्या. बत्ती पुन्हा लावली आणि पोथीजवळ जाऊन नमस्कार केला. दरवाजा बाहेरून बंद करून घेऊन तो बाहेर तर पडला.

रात्र चांदणी असल्यामुळें चंद्रप्रकाश पडला होता. खरें पाहूं गेल्यास सुंदरचें मस्तक शून्य झालें होतें. तो करीत होता त्या साऱ्या गोष्टी लहरींतल्या होत्या. जेव्हां त्यानें आईची प्रकृति चमत्कारिक झालेली पाहिली तेव्हांच पहिल्या शोकावेगाबरोबर मनःस्थिति उडाली होती. अर्थात् जरी तो आतां डॉक्टरच्या घरचा रोख धरून निघाला होता तरी पुढें त्याचे तेच विचार टिकणें शक्य नव्हतें. त्याचें डोकें ठिकाणावर नव्हतें. आपली परिस्थिति न कळण्याइतका तो अज्ञान नव्हता. " कुठल्या आशेच्या तंतूला धरून डॉक्टरकडे जायचें ? आपल्याला

आतां जगांत राहून तरी काय करायचें ? जगांत तरी न्याय कुठें आहे ? जगांत देव तरी आहे काय ? असेल तर त्याची नजर जगांतील व्यवहारांकडे व बरीं वाईट कृत्यें करणाऱ्यांकडे फिरते काय ? माणसांनीं देवाच्या उपासनेचा व परमेश्वरभक्तीचा म्हणून जो मार्ग काढला आहे तो तरी बरोबर आहे काय ? त्या मार्गानें जर परमेश्वर असला तर त्याची कृपा होणें शक्य आहे काय ? मीं आजपर्यंत जी देवाची उपासना केली तिचा कांहींच उपयोग नाहीं काय ? मी काय असें महत्पाप केलें होतें, कीं देवानें माझ्यावर संकटेंच सारखीं आणलीं ? परंतु नाहीं. संकटें आणणारा देव नाहीं. त्याला आमचींच पूर्वजन्मींचीं अथवा या जन्मींचीं कृत्यें कारण होत असतील. परंतु आपलें तनमनधन अर्पण करून एक निश्चयानें रोज त्याला आळविलें असतांही ऐनप्रसंगीं देखील तो गरीबाच्या हांकेला "ओ" देणार नाहीं का ? इतका तो निष्ठुर आहे ? पोथ्या–कथा–पुराणांतून, धर्मग्रंथांतून जीं त्या सगुण देवाचीं दीनरक्षणतत्परतेचीं वर्णनें ऐकतों तीं सर्व व्यर्थच काय ? कीं मीच चांडाळ पापी ? म्हणून त्याच्या कृपेस पात्र होत नाहीं ? कसेंही जरी असलें तरी एवढें खरें, कीं माझी आई मला सोडून गेली. जिच्यासाठीं जगावयाचें तीच मला सोडून गेली. आतां मला येथें राहून काय करावयाचें आहे ?"

अशा प्रकारच्या विचारांच्या तंद्रींत असतांना त्यानें डॉक्टरचें घर मागें टाकून तो भलतीकडेच चालला. त्याचीं पावलें कोणीकडच्या कोणीकडे वळूं लागलीं. एकामागून एक विचार येत असतां त्याच्या विचारांची दिशा बदलली. निरुपयोगी म्हणूनच जड झालेलें–त्याच्या मतें खावयास काळ व भूमीस भार झालेलें–लोकांकडून 'चोर' म्हणून निंदा करून घेण्यास पात्र झालेलें–जीवित संपविणेंच चांगलें असें त्याला वाटूं लागलें. असे विचार मनांत येण्याबरोबर चालत असतां तो मध्येंमध्येंच कांहीं क्षण थांबूं लागला. कारण आपल्या जीविताचा अंत कोणत्या प्रकारें करावा हेंच तो आपल्या मनाशीं ठरवीत असावा. जातांना वाटेंत एके ठिकाणीं त्यास आड लागला. त्याच्या कांठावर तो एकदम झरझर चालत गेला. पण कांठावरूनच तो मागें परतला. त्यानें आपलें मन फिरविलें. अण्णासाहेबांच्या घरापासून जवळच थोड्या अंतरावर–सुमारें दोन फर्लांगांच्या अंतरावर–नदी वाहत होती. त्याच्या डोळ्यांवर ती नदीच आली असावी. कारण त्याचीं पावलें त्याच दिशेकडे वळलीं.

पण तो अशा रीतीनें स्वतःशींच विचार करीत भ्रमिष्ट स्थितींत चालत असतां त्याच्या मागून निरनिराळ्या दिशांनीं, निरनिराळ्या वाटांनीं, वेगवेगळ्या विचारांनीं प्रेरित झालेल्या व वेगवेगळीं कार्यें करण्यासाठीं उतावीळ झालेल्या अशा सहा व्यक्ति चालत होत्या. त्या कोणत्या हें गुप्त ठेवून वाचकांस बुचकळ्यांत ठेवण्याचें कांहीं कारण नाहीं.

सुंदरनें विनायकास अनाथ विद्यार्थी फंडाची हकीगत कळवून मिशनऱ्यांची मदत सोडून बिनधोकपणें चक्रपुरास येण्याविषयीं जें पत्र पाठविलें होतें तें त्याला पोंचलें. त्याचा त्यानें पूर्ण विचार करून, एके दिवशीं तो हळूच कोणास खरा मतलब कळूं न देतां चक्रपुरास आला. मिशनऱ्यांनीं त्याच्या धर्मांतराची तयारी केलेलीच होती. विनायकानेंही आतां त्यास आपली पूर्ण संमति दिली होती. परंतु आईसंबंधीं कांहीं हकीगत सांगून विनायक चक्रपुरास आला. तो आला त्याच दिवशीं त्याची व गोपाळाची गांठ पडली. गोपाळाची व विनायकाची चांगलीच दोस्ती होती. इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलतां बोलतां गोपूनें, गणू व हरी यांची दामूबरोबर थोड्याच दिवसांपूर्वी घडलेली हकीगत कळविली. विनूनें सुंदरसंबंधीं हकीगत विचारली. गोपूनें गांवांत पसरलेल्या सुंदरच्या चोरीविषयीं व त्याच्या आईच्या आजारीपणाविषयीं हकीगत कळविली. गोपूचें व विनायकाचें हें बोलणें चाललें असतां बोलत बोलत ते सुंदरकडेच येण्याकरितां निघाले. बाकी विनायकाला गोपूच्या तोंडची हकीगत ऐकून एक जबर संशय आला, व त्याबरोबर त्यानें गोपूस हरी व गणूनें आणलेली नोट पाहून ठेविली आहे काय म्हणून विचारलें. गोपूनें त्या नोटीचा नंबर आपल्या वडिलांनीं टिपून घेतल्याचें सांगितलें. त्यानंतर त्यांचा व दादासाहेबांचा पत्रव्यवहार झाला आहे. शिवाय तिसराच एक इसम त्या नोटीचा टिपून घेतलेला नंबर पाहून व आपल्या वडिलांस भेटून बऱ्याचशा गोष्टी बराच वेळ बसून बोलून गेल्याची हकीगत विनायकास कळविली. ती ऐकून त्यास एक प्रकारचें समाधान वाटलें. वेळ रात्रीची होती. रात्र बरीच झाली होती तरी गोष्टीच्या भरांत विनायक गोपाळासह उत्सुकतेनें सुंदरला भेटण्याकरितां म्हणून त्याजकडे जाण्यास निघाला. तो चालला असतां सुंदरसारखाच कोणी तरी एकटा आपल्याच पुढें थोड्या अंतरावरून चालत असावा असें त्यास वाटलें. म्हणून त्याच्या घराकडे जावयास न निघतां ते त्याच्या मागूनच चालले. ते लवकर लवकर चालून त्यास गांठून घेण्या-

करितां दोघांनीं जलदी केली. त्याच्या नांवानें त्याला हांक मारावी असेंही त्यांच्या मनांत आलें आणि त्याप्रमाणें विनायक "सुंदर" म्हणून हाक मारणार देखील होता. पण इतक्यांत आपल्याच बाजूनें परंतु सुंदरच्याच पाठलागावर एक पुढें व दोघे मागें अशा तीन व्यक्ति कोणी आडून आडून चालल्या आहेत असें विनायकानें पाहिलें व त्यानें आपल्या नजरेस आलेली गोष्ट गोपूस कळूं न देतां आपली वाट बदलली.

पण ह्या तीन व्यक्ति कोण होत्या ? त्याच सायंकाळीं अण्णासाहेबांच्या खोलींत हरी, गणू, गोविंद व आणखी एक पूर्वी बाराव्या प्रकरणाच्या अखेरीस उल्लेख केलेली धटिंगण व्यक्ति अशा चौघांचें बोलणें चाललें होतें. ती धटिंगण व्यक्ति बाहेर लांब आंब्याच्या झाडाखालीं काळोखांत होती. परंतु गणपत हरी व गोविंद यांचा आपसांत तंटा चालला होता. कांहीं तरी वस्तू आपल्याकडे असावी असें प्रत्येकाचें ह्मणणें होतें. त्यांतही गणू व हरी एका पक्षाला होते व गोविंद दुसऱ्या पक्षाला होता. गोविंद ह्मणे त्या वस्तूवर हक्क आपला आहे आणि गणू व हरी ह्मणत, कीं त्यावर खरा हक्क आपला आहे. वेळेपुरता गणू व हरी आपला हक्क नाकबूल करण्यास तयार होते. पण अशा अटीवर, कीं ती आपल्या ताब्यांत असावी. आपण ती दोघेच बळकावून बसणार नाहीं, असें त्यांचें ह्मणणें होतें. ज्या वस्तूविषयीं भांडण चाललें होतें, ती त्या क्षणीं गोविंदाच्या हातांत असावी. कारण गोविंद तिच्या जोरावरच शिरजोरपणें बोलत होता. त्या दोघांस आपल्याकडची वस्तू आपण सहजासहजीं गमावून बसलों याबद्दल पश्चात्ताप होऊन ते दोघेही आतां त्याच्यावर हल्ला करण्याच्या विचारांत होते. इतक्यांत गोविंद बोलत बोलतच जाण्याकरितां म्हणून बाहेर पडला. ते बाहेर येतात तों ती धटिंगण व्यक्ति उभी असलेली त्यांस आढळली. त्या दोघांनीं गोविंदास सांगितलें होतें, कीं त्याच धटिंगणास वेळोवेळीं पैसे चारण्यास आपणांस फार खर्च झाला आहे व तो बोजा तुझ्यावर आहे. गोविंद ती गोष्ट कबूल करीत नव्हता. गोविंदाबरोबर गणू व हरी बाहेर आले, आणि त्यांनीं त्या धटिंगणास "तूं बोलावल्याशिवाय इथें कां आलास ?" ह्मणून विचारलें. त्याबरोबर त्यानें आपणाला आतांच्या आतां पैसे न मिळाल्यास आपण या सर्व गोष्टीचा पुकारा करूं असें सांगितलें. कारण तो स्वतः आपल्या अपराधाबद्दल भोगावें लागणारें प्रायश्चित्त भोगण्यास कबूल होता ! त्यामुळें त्या तिघांसही त्याची भीति वाटे. पण ह्या

खेपेस त्यांनीं त्यास दरडावण्याचा प्रयत्न केला. त्या क्षणींच त्यानें एका बाजूकडे बोट दाखवून सांगितलें, कीं "तो पहा सुंदर चालला आहे, त्याला मी आतां या क्षणीं जाऊन सर्व गोष्ट कळवितों." हे शब्द ऐकल्याबरोबर सर्वांचे डोळे त्या दिशेकडे लागले. तिघांनींही आपला वाद आपसांत मिटवून त्या धटिंगणास कांहीं देऊन वाटेस लावलें. व ते तिघेही, सुंदर अशा भलत्याच वेळीं कोणीकडे चालला आहे हें पहाण्याकरितां ह्मणून चोर पावलांनीं दबत दबत लपत छपत त्याच्या मागून निघाले. हा चाललेला सर्व प्रकार एक व्यक्ति पहात होती. तीही त्यांच्या मागोमाग निराळ्याच वाटेनें चालली. तिची नजर मात्र सर्वांवर होती. पण तिच्याकडे मात्र कोणाचेंही लक्ष नव्हतें.

गणू, हरी व गोविंद यांच्या मनांत लपत लपत जात असतां निरनिराळे विचार येत होते. गोविंदानें जेव्हां सुंदरचीं पावलें नदीकडे वळतांना पाहिलीं तेव्हां त्याच्या अंतःकरणांत एका राक्षसी विचारानें प्रवेश केला. पण त्याच्या मागून जाणाऱ्या एकालाही अशा वेळीं सुंदरचा नदीकडे जाण्यांत काय हेतू होता याची अटकळ होत नव्हती. गणू व हरी यांच्या मनांत आतां सुंदरबरोबरच गोविंदाचाही राग येत होता. किंबहुना या क्षणीं सुंदरपेक्षां त्यांना गोविंदाचाच फार राग आला होता. त्याचा सूड कसा उगवावा व आपला हेतू कसा साधावा याबद्दल त्यांच्या मनांत विचार घोळत होते. बाहेर निघतांना त्यांच्या भांडणाचें कारण जी वस्तू ती गोविंदाकडेच राहून गेली होती. अर्थात् साधल्यास येतांना अगर प्रसंगानुसार गोविंदाकडून ती हिसकावून घ्यावी असाही विचार त्यांचे मनांत येत होता.

अशा प्रकारची प्रत्येकाची मनःस्थिति होती. सुंदर तर शून्य मनानें यंत्रासारखा चालला होता. याच नदीवर पहांटेच्या प्रहरीं त्यानें कित्येक वेळां कार्तिकस्नानें व माघस्नानें केलीं होतीं. याच नदींत त्यानें आपल्या स्नेह्यांबरोबर पोहण्याच्या शर्यतींत भाग घेतला होता. याच नदीच्या तीरावर तो सूर्यास्ताच्या वेळीं सहल करून परततांना सृष्टिशोभा पहात बसला होता. त्याच्या पूर्ण परिचयाची ही नदी होती. या नदीची बाहेरच्या प्रमाणें त्या ठिकाणा पुरती आंतीलही त्याला बरीच माहिती होती. नदी उथळ कोठें आहे व पाणी खोल कुठें आहे हेंही त्याला ठाऊक होतें. याच नदीवर आतां तो निराळाच हेतू मनांत धरून आला होता. या नदीच्या तीरावर शेतें व मळे होते. शेतकऱ्यानें मोट लावण्याकरिता

तयार केलेल्या उंच जागेवर तो जाऊन उभा राहिला. या जागेवरून त्यानें पूर्वी कित्येक वेळां उड्या घेतल्या असतील. पण त्या वेळीं प्रत्येक उडीबरोबर बुडी मारून आंत कांहीं वेळ राहून नंतर तो वर आला होता. आज त्याला या डोहांत कायमची बुडी मारून बसावयाचें होतें ! त्याच्या भडकून गेलेल्या मस्तकांत आत्महत्येशिवाय दुसरा कोणताही विचार नव्हता. आपला अभ्यास, नोकरी, आई, जग, देव, शत्रू, मित्र या सर्वांस तो पार विसरून गेला होता. कोणत्याही तऱ्हेनें जीवाचा अंत करावा एवढाच विचार त्यास सुचत होता. त्या स्थितींत, आपण नेहमींप्रमाणेंच पोहण्याकरितां उडी मारतों तशीच आतांही मारीत आहोंत; कदाचित् अशानें आपला हेतू साधणार नाहीं याकरितां कांहीं जड वस्तू गळयास अगर कंबरेस बांधावी हाही विचार त्यास नव्हता. आपण करूं त्या उपायानें आपला हेतू सिद्धीस जाईल अशी त्याची समजूत व खात्रीही होती. त्यानें धोतर देखील सांवरलें नाहीं. तो त्या उंच ठिकाणीं अंगांतल्या सदऱ्यासह कांहीं वेळ त्या डोहाकडे पहात उभा होता. पाठीमागें चंद्रोदय झाला होता; त्यामुळें या उंच दरडीखालच्या डोहांत चंद्रप्रकाश पडला नव्हता. अर्थात् त्या डोहांतील काळ्याकुट्ट अंधारांत तें काळेंकुट्ट पाणी अधिकच भीतिप्रद भासत होतें.

याक्षणीं सुंदरच्या मनांत देवधर्म कांहींच नव्हतें. परंतु संवय ही मनुष्याला यंत्राप्रमाणें वागविते. कोणतेंही काम करतांना सुंदरला आपल्या आराध्यदेवतेला हांक मारण्याची संवय असे. त्यामुळें त्याच्या तोंडून त्याला नकळत, त्याच्या इच्छेविरुद्ध ह्मणा पाहिजे तर आपोआप "श्रीशंकर, महादेव !" असे शब्द बाहेर पडले.

पण हे शब्द त्याच्या मुखांतून बाहेर पडण्याच्यापूर्वीच त्याच्यावर त्याला ढकलून देण्याकरितां झडप पडली. सैतानी वासनेनें ज्याच्या मनांत प्रवेश केला होता, त्या गोविंदानें सुंदरला डोहांत ढकलून देण्याकरितां म्हणून आपल्या दोन्ही सोबत्यांस आपल्या मागें धावतांना पाहून धूम ठोकली व न जाणों सुंदर तिथून परत मागें परतेल तर तो परतण्यापूर्वी त्याला ढकलून द्यावें ह्मणून त्यानें अघाडी साधली ! खरें पाहतां सुंदरकडे दुर्लक्ष करून गणू व हरी यांनीं गोविंदावर हल्ला करण्याचा बेत केला होता. गोविंदाला वाटलें, कीं आपणाप्रमाणेंच सुंदरला ढकलण्याचा याही दोघांचा विचार असून ते आपल्या कामांत सहकारी आहेत; अशा समजुतीनें गोविंदानें अघाडी मारली होती. गोविंदानें ढकलण्यापूर्वीच परमेश्व-

राचें नांव घेऊन सुंदरनें डोहांत उडी ठोकली होती. पाण्यांत धाडकन् आवाज झाला. पण तो आवाज नाहींसा होण्यापूर्वीच त्याच क्षणीं दोन व्यक्ती डावीकडच्या झाडींतून प्रकट होऊन त्यांनीं 'धाड धाड' उड्या ठोकल्या आणि नदीच्या पाण्यांत एकच खळबळ उडाली.

गोविंद ज्याक्षणीं सुंदरला ढकलण्याकरितां म्हणून त्याच्या मागें येऊन पोंचला, त्याच क्षणीं त्याच्या मागें एक भव्य व भयंकर व्यक्ति येऊन तिनें गोविंदाचे हात पकडले होते. आणि हा प्रकार इतका अकल्पित व अचानक घडला, कीं तो गोविंदाचा पाठलाग करणाऱ्या हरी व गणू यांच्या नजरेस देखील येण्याइतका अवसर मध्यंतरीं गेला नाहीं. त्या व्यक्तीला पाहण्याबरोबर गोविंदाचा हात आपोआप खिशांत गेला! गोविंदाचे हातांकडे पहात त्या भव्य मूर्तीनें विचारलें—.

"सुंदरला ढकलण्याचा विचार होता वाटतें आपला?" तो उपहासाचा व दरडावण्याचा स्वर ऐकून गर्भगलित झालेल्या गोविंदाची बोबडी वळली. तो बोलण्याचा प्रयत्न करणार इतक्यांत ती भव्य व्यक्ति ह्मणाली—

"काढ, त्या चार नोटा बाहेर काढ! अथवा नको. एव्हां तुझ्याच खिशांत असूं दे! पण नकोच.

असें म्हणून त्याच्या खिशांत हात घालून त्या चार नोटा त्या भव्य मूर्तीनें काढून घेतल्या!

गणू व हरी जागच्याजागीं थिजून गेले होते! सर्वच व्यक्तींवर अथपासून इतिपर्यंत नजर असल्यामुळें प्रत्येकाच्या हालचालींचा अर्थ व हेतू त्या भव्य व्यक्तीस कळून चुकला होता. म्हणूनच नदींत तीन उड्या, पडल्या तरी ती व्यक्ति शांत होती. कारण मागून पडलेल्या दोन उड्या त्या सुंदरला काढण्याकरितां पडलेल्या असून तो लवकरच सुरक्षित बाहेर निघेल हें त्याला पक्कें ठाऊक होतें. ह्मणूनच तो मधून मधून नदींतील खळबळीकडे पहात होता. कारण जरूर पडल्यास तिचीही पाण्यांत उडी टाकण्याची तयारी होतो!

प्रकरण पंधरावें.

उपसंहार.

दादासाहेबांना पक्कें ठाऊक होतें, कीं सुंदरनें नसली तर दुसऱ्या कोणी तरी आपल्याचकडच्या माणसानें चारशें रुपयांची चोरी केली असली पाहिजे. तेव्हां ही केस पोलीसांत गेल्यास त्याचें जन्माचें नुकसान होऊं नये अशा विचारानें त्यांनीं गुप्तपणें गुन्हा पकडण्याच्या कामांत निष्णात असलेल्या बळवंतराव नांवाच्या आपल्या स्नेह्यास ही समग्र हकीगत कळवून त्याच्या ताब्यांत ती केस दिली. एरवीं सुंदरनें चोरी केलेली नाहीं असें त्यांचें मन त्यांस सांगत होतें. परंतु त्यांस स्वतःस तें सिद्ध करून देतां आलें नसतें आणि मालकानेंच आपल्या नोकरांपैकीं एकाचा पक्षपात केल्यासारखा झाला असता. यासाठीं त्यांनीं ती केस परक्याच्या हातांत दिली. अर्थात बळवंतराव त्याच तपासावर कित्येक दिवस होते. व त्याचा त्यांनीं आपल्याशीं केव्हांच निकालही ठरवून टाकलेला होता. परंतु एकंदर गोष्टी किती थरास पोंचतात ती गंमत पहाण्याकरितांच म्हणून त्यांनीं गम-तीनें दिवसगत लाविली; आणि शेवटीं मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें निकाल झाला.

सुंदरनें उडी टाकली ती त्यानें स्वतःच, कीं गोविंदानें त्याला ढकलला इकडे लक्ष न देतां, गर्द झाडींतून लपत आलेल्या विनायक व गोपाळ यांनीं सुंदर पाण्यांत पडलेला पाहतांच आपल्या आंगावरचे कपडे फेंकून धडाधड त्याच्या मागोमाग उड्या घेतल्या. तेथें उभ्या असलेल्या त्या भव्य व्यक्तीची म्हणजे बळवंत-रावांची जरूर लागल्यास नदींत उतरण्याची तयारी होतीच. परंतु चलाख विना-यकानें गोपाळाच्या मदतीनें सुंदरच्या नाकातोंडांत पाणी शिरण्यापूर्वीच त्यास बाहेर काढलें. बेशुद्ध स्थितींतच त्यास दादासाहेबांच्या बंगल्यावर आणण्यांत आलें. त्याच्या आईबद्दलची हकीगत कोणास कळली नव्हती. अनेक उपाय करून त्यास सावध करण्यांत आलें. दुसऱ्या दिवशीं तो साधारण शुद्धींत आल्यावर त्यास आपला पुनर्जन्म झाल्याप्रमाणें वाटूं लागलें. मागील गोष्टी त्यास कांहीं आठवेनात. परंतु कांहीं वेळानें पूर्व दिवशींची हकीगत त्याच्या लक्षांत येऊन तो रडूं लागला. सुंदरच्या आईची स्थिति सुंदरच्या तोंडून ऐकतांच तिकडेच

सगळ्याचें लक्ष गुंतलें. सुंदरवर ओढवलेल्या या भयंकर प्रसंगांत प्रत्येकजण त्याच्या दुःखाचा भागीदार झाला. कारण जाहीर रीतीनें जरी अझून चोरीच्या घोटाळ्यांचा निकाल प्रसिद्ध झाला नव्हता, तरी त्या रात्रीची हकीगत सर्वांच्या तोंडीं होऊन गेली. सुंदर निर्दोषपणें बाहेर पडल्याबद्दल जो तो त्याच्याबद्दल सहानुभूति दाखवूं लागला.

सुंदरचा दुःखभार हलका होत जाऊन त्यास किंचित् त्या प्रसंगाचा विसर पडल्यासारखा झाल्यावर चोरीच्या घोटाळ्याची चौकशी झाली. बळवंतरावांनीं गोविंदास नोटींसह पकडला होताच. आणि त्याचे भागीदार गणू व हरी, गणूचे वडील, दामू, एक गुराखी धनगर, गोपू व गोपूचे वडील म्हणजे त्या कांच वगैरे मालाचे व्यापारी, ही सगळी मंडळी त्याचप्रमाणें बळवंतराव, दादासाहेब, अण्णासाहेब, हेडमास्तरसाहेब वगैरे इतरही सभ्य मंडळी या वेळीं हजर होती.

पूर्वींच्या चौकशीच्या वेळीं जी हकीगत सुंदरनें सांगितली होती, त्यापेक्षां अधिक त्यास कांहींच सांगावयाचें नव्हतें. त्यानें तीच हकीगत पुनः जशीच्या तशी सांगितली.

त्यानंतर गोविंदास आपली खरी हकीगत सांगावी लागली. गोविंदाला आपण चोरी केल्याचें कबूल करावें लागलें. त्या दिवशीं सुंदर ज्या ठिकाणीं बसत होता त्या तेथें जाऊन, त्यानें त्या दिवशींचें काम पुरें केल्यावर चारशें रुपयांच्या नोटा कशा हस्तगत केल्या व त्या बाबतींत पुढें आपले पूर्वीपासूनचे भागीदार गणू व हरी यांच्या त्या कां स्वाधीन केल्या तेंही सांगितलें. आपला कोणास संशय येऊं नये ह्मणून आणि गणू व हरी यांनाही त्यांतील वांटा मिळावयाचा होता ह्मणून गोविंदानें त्या नोटा मोडून घेण्याकरितां गणू व हरीच्या स्वाधीन केल्या होत्या. पुढें गणू व हरी हे दोघेही त्यांतील एक नोट मोडण्याकरितां गोपूचे वडिलांच्या दुकानांत गेले. तेथें त्यांनीं दामूस कसा पुढें केला व नंतर सर्वांचीच कशी गंमत उडाली ती हकीगत दामूकडून कळली. त्या नोटीचा नंबर ऑफिसांत होताच. गोपूच्या वडिलांनींही तो टिपून घेण्याची त्या वेळीं हुशारी केली होती. तो नंबर व त्या नंबरची नोट घेऊन येणाऱ्या मुलांचीं नांवें जेव्हां बळवंतरावांस व दादासाहेबांस कळलीं तेव्हांच या सर्व घोंटाळ्याचा उलगडा झाल्यासारखा झाला होता. गोपूची व त्याच्या वडिलांचीही जबानी झाली. त्यांनीं आपल्या

दुकानांत घडलेली इत्थंभूत हकीगत सांगितली. ती आतां नाकबूल करणें गोविंद, गणू व हरी यांस शक्यच नव्हतें. अण्णासाहेब व गणूचे वडील यांच्या माना खालीं पडल्यासारख्या झाल्या.

नंतर अण्णासाहेबांनीं सुचविलेल्या पांच रुपयांच्या नोटीचे आरोपाविषयींची सुनावणी झाली. दामूच्या डोक्यांत गणू, हरी व गोविंदा यांच्या उघडकीस आलेल्या लबाड्या जसजशा येत चालल्या, तसतसा त्याला आपण त्यांच्या तावडींत सांपडून त्यांचीं निंद्य कृत्यें साध्य करून देण्याचें एक साधनच बनलों याबद्दल त्यास पश्चात्ताप झाला. त्या चांडाळ त्रिकूटाबद्दलचा त्याचा संताप वाढूं लागला. कारण भलताच प्रसंग येईल असें कांहीं करून आपणास त्यांत गुंतवूं नका, असें तो त्यांस मुळापासूनच सांगत आला होता. त्यामुळें त्यानें चिडून जाऊन सर्व हकीगत कळविली. सुंदरनें मागें बाराव्या प्रकरणांत ती नोट मिशनऱ्यांची अशी समजून आपण रागानें ती देऊन टाकावयास निघालों व दादासाहेबांच्या बंगल्यांत शुद्धीवर आल्यावर आपल्या खिशांत ती नव्हती असें सांगितलेंच होतें. परंतु अण्णासाहेबांनीं वेळ व खाणाखुणा पटवून दिल्यावर सुंदरला 'खेळगडी' ची जाहिरात असलेला तो केसरीच्या अंकाचा तुकडा आठवला व त्यांत गुंडाळलेला लाडूही आठवला. त्यावरून ती नोट मिशनऱ्यांची नसून अण्णासाहेबांची होती हेंही त्याला पटलें. परंतु त्याचें ह्मणणें इतकेंच, कीं ती कोणाची असली तरी ती घेण्याची आपली इच्छाही नव्हती व ती आपण घेतलीही नाहीं. सुंदरची अशी झालेली समजूत व ही हकीगत खरी असल्याबद्दल विनायकानेंही सांगितलें. परंतु त्यानंतर पुढें घडलेला प्रकार सांगण्यास दामूस व त्या धनगरास बळवंतरावांनीं सांगितल्यावरून खरा प्रकार सर्वांस कळून आला.

आदल्या दिवशीं विनायकानें सुंदरला मिशनऱ्यांच्या कँपकडे घेऊन जातों म्हणून सांगितलें होतें. परंतु मिशनऱ्यांकडेच अडकल्यामुळें आपणांस सुंदरबरोबर जाण्याकरितां वक्तशीर यावयास मिळालें नाहीं ह्मणून विनायकानें सांगितलें. सुंदरचा मिशनऱ्यांकडे जावयाचा बेत गणूनें ऐकल्यामुळें त्यास कळून चुकला होता. व त्याच्यावर त्याचा डोळा होताच. विनू सुंदरच्या बरोबर नाहीं असें पाहतांच त्यांनीं आपण बाजूला राहून दामूस सुंदरला चक्रपूरच्या वेशीच्या बाहेर न्यावयास लावलें. खरा कँप कुठें आहे हें सुंदरला माहीत नसल्या-

मुळें तो फसला. त्यानें त्याची वाट चुकवून त्यास संध्याकाळच्या वेळीं वेशीच्या बाहेर घालवला आणि सोबत्यांच्या शिकवणीबरहुकूम तो मागें परतला. ठराविक जागीं त्याला त्याचे सोबती मिळाले नाहींत, म्हणून तो त्यांच्या घरीं गेला. पण नेहमीं जमण्याच्या ठिकाणीं म्हणजे हरीच्या खोलींतही कोणी नव्हतें. मग दामू आपल्या घरीं गेला.

सुंदरला दामूनें वेशीच्या बाहेर काढलें असें समजून गणू, हरी व गोविंद यांनीं पूर्वीपासून तयार केलेल्या एका दांडगट गुराख्यास सुंदरला काळोख पडण्याच्या सुमारास गांठून त्यास मार देण्यास सांगितलें. त्या कामांत त्या दांडगटाच्या संवईप्रमाणें त्यानें गणू व हरीकडून पैसे घेऊन तो दारू पिऊन तर्रर्र झालाच होता. व पुढेंही तशाच प्रकारचा त्यांचा ठरावही झाला होता. सुंदरच्या खिशांत पांच रुपयांची नोट आहे याबद्दल गणूची पक्की खात्री होतीच. म्हणून त्य दिवशींच्या कामगिरीसाठीं सुंदरच्या खिशांत जें कांहीं सांपडेल तें त्यानें घ्यावें असें ठरलें होतें. त्याला तो दांडगट खूषही झाला होता.

दामूनें सुंदरला आड वाटेनें लावला. पण पुढचें कृष्णकृत्य त्यास मुळींच ठाऊक नव्हतें. तें त्याला माहीत असतें तर तो त्यांच्या सांसर्गासही आला नसता. हे भयंकर बेत ऐकून त्याला त्यांच्याबद्दल किळस आली! सर्वच लोक या त्रिकूटाच्या दुष्ट कृत्यांबद्दल संतापून गेले. गणूच्याच तोंडून बाहेर पडलेली ही हकीगत त्या दांडगटानें आणि हरी व गोविंद यांनीं कबूल केली. दामूनें तर सर्व सांगून टाकलेंच होतें. ह्या गोष्टी बाहेर पडत असतांना हरीनें सुंदरला दपटशा देऊन अण्णासाहेबांच्या हुकमाशिवाय आपणच त्यास वारास यावयाचा बंद केल्याचेंही बेंड फुटलें. अण्णासाहेब पूर्णपणें ओशाळून गेले. याप्रमाणें पांच रुपयांची नोट गिळंकृत केल्याचा जो वृथाआरोप सुंदरवर अण्णासाहेबांनीं आपल्या मतें प्रामाणिकपणें लादला होता त्याचें निरसन झालें व ती नोट कुठें कशी गेली हें त्यांस शेवटीं नक्की कळलें.

वर लिहिल्याप्रमाणें प्रथम जरी तो दांडगट मनुष्य खूष झाला, तरी त्याला एकंदर हकीगत कळल्यावर या पोरांकडून दारूसाठीं आणखीही पैसा उपटावयास हें बरें साधन आहे असें त्यास वाटलें. तो तें भयंकर कृत्य बाहेर फोडण्याची भीति दाखवून रोज रोज अधिकाधिक पैसे मागूं लागला. रोज नाहीं, तरी मधून

मधून त्याची गरज भागविणें या त्रिकूटास भाग पडे. यासाठींच तो वरचेवर गणू व हरीकडे सायंकाळच्या वेळीं येत असे.

गणू व हरी यांस बिडी वगैरे व्यसनें होतींच. तीं भागविण्याकरितां, या दांडगटास देण्यासाठीं लागणारे पैसे मिळविण्याकरितां व मुख्यतः सुंदरवर चोरीचा आरोप घालून त्याच्या जन्माचें मातेरें करण्याकरितां म्हणून गणू व हरी यांनीं अगोदरच मत्सरानें खवळून गेलेल्या गोविंदास एकादी मोठी रकम चोरण्याची मसलत दिली व त्यास तें कृत्य करण्यास तयार केला. पुढची हकीगत वर आलीच आहे.

याप्रमाणें साऱ्या अंधारांतल्या गोष्टी चव्हाट्यावर येऊन त्या दिवशीं सुंदर आरोपांतून धुतलेल्या तांदळांप्रमाणें स्वच्छ व निष्पाप बाहेर पडला. त्याच्याकडे सर्वजण एक प्रकारच्या शुद्ध भावनेनें पाहूं लागले.त्या वेळेपुरता तो मातृवियोगदुःख विसरला होता. त्यास आराध्य देवतेची आठवण होऊन त्याचें अंतःकरण भक्तिभावानें व कृतज्ञतेनें भरून आलें. पूर्वीच्या अविचारी–अविचारानें केलेल्या–देवाच्या निर्भत्सनेची त्यास मनांत लाज वाटूं लागली. सुंदर निर्दोषी असल्याबद्दल सर्वांनीं एकमतानें कबूल केलें. गणू व हरी यांनीं आपणास जणूं पश्चात्ताप झाला आहे असें दाखविण्याकरितां खालीं माना घातल्या होत्या. पण ते पक्के निगरगट्ट बनले होते. मात्र त्यांना सुंदरचा कारण नसतां आपण मत्सर करूं लागलों, असें मनांतल्या मनांत वाटूं लागलें होतें. गोविंदाही, दुखवलेल्या पण दंश करण्याचा हेतू पूर्ण न झालेल्या सर्पाप्रमाणें मनांत सारखा चरफडत होता. तथापि त्याला आतां निमूट राहणेंच प्राप्त झालें होतें. गोविंदाचें बंधुराजही तेथें त्या दिवशीं हजर होते व तेही अण्णासाहेबांप्रमाणें खट्टू होऊन गेले होते.

* * * *

हेडमास्तरसाहेब व दादासाहेब यांना मात्र त्या दिवशीं मनापासून खरा आनंद झाला. गणू, हरी व गोविंद यांस हेडमास्तरसाहेब कायमचे रस्टिकेट् करणार होते; परंतु त्यांनीं विचार करून त्यांस एक वर्षच शाळेंत बंद केलें. त्याशिवाय त्यांना घरून शिक्षा झाली ती निराळीच. गोविंदाला नोकरी तर अंतरलीच, पण त्याला कोणत्याही प्रकारची मदत मिळण्याचीही आशा उरली नाहीं. दामूलाही थोडीशी शिक्षा करण्यांत आली.

त्या दांडगटाला योग्य शिक्षा करण्याकरितां बळवंतरावांच्याच स्वाधीन करण्यांत आलें. विनायक, योग्यरीतीनें वागल्याबद्दल व मित्रकार्यास्तव झटल्याबद्दल त्याची व गोपूची वाहवा झाली. विनायकाला अनाथ विद्यार्थिफंडाशिवाय आणखीही लोकांकडून मदत मिळाली. विनायकाचा गोविंदाच्या जागीं नोकरीवर राहून अभ्यास सुरू झाला.

* * * *

चक्रपुरांत स्थापन झालेल्या अनाथविद्यार्थी फंडाचा, पुष्कळ गरीब विद्यार्थ्यांस उपयोग होत असून, तेथील हायस्कुलांत पुष्कळ दूरदूरचीं मुलें जमूं लागली. कारण तो फंड विशिष्ट जातीच्या, धर्माच्या, अगर पंथाच्या मुलांस द्यावयाचा नसून उत्तम शीलाच्या, हुशार व सदाचरणी मुलांसच त्यांतून मदत करण्यांत येते.

* * * *

सुंदरवर दादासाहेबांचें अतोनात प्रेम जडलें असून, त्या निराधार व सद्गुणी मुलास त्यांनीं स्वतःच्याच कुटुंबांत ठेवून घेतलें आहे. दादासाहेबांची कमल, त्याच्याकडे लिहायला वाचावयाला व शिकावयास बसते. त्या दोघांना एकत्र पाहून दादासाहेबांच्या नजरेसमोर भावी स्थितीचे देखावे दिसूं लागतात. सुंदरवर दादासाहेबांची बहाल मर्जी जडल्याकारणानें त्यास आतां कोणीही ‘सुंदर’ न ह्मणतां ‘सुंदरराव’ ह्मणतात. सुंदर मॅट्रिकला बसणार असून तो खात्रीनें पास होणार याबद्दल हेडमास्तरसाहेबांनीं दादासाहेबांना वचनच देऊन टाकलें आहे. तो आतां आईचें दुःख विसरत चालला आहे, तरी तिनें अखेरच्या वेळीं केलेल्या उपदेशाची–त्या तिच्या शेवटच्या शब्दांची–गुणगूण अझूनही त्याच्या कानांत आहे व ती अशीच कायम रहावी अशी त्याची इच्छा आहे.

तो पास झाल्यावर त्याला परदेशांत शिक्षणाकरितां पाठविण्याचा इरादा असून त्याला सुंदर तयार आहे. आपल्या शीलाच्या योगानें हिंदुस्थानच्या विद्यार्थिवर्गाची पत तो परकीयांच्या देशांत वाढवील अशी सगळ्यांस खात्री आहे. परंतु जातांना आपली ‘शिवलीले’ची पोथी खिशांतून नेण्याचा त्याचा निश्चय मात्र कायम आहे.

आतां त्याला सुंदर देव्हारा मिळाला असून, तो आपली स्नानसंध्या, अर्चन, पूजा, वाचन वगैरे यथास्थित, यथासांग चालवीत असतो. 'जातांना आपला देव्हाराही घेऊन जाईनास' असें म्हणून त्याचे स्नेही सोबती त्यास चिडवतात. पण त्याचा, आपली शिवलीलेची पोथी बरोबर नेण्याचा निश्चय बदललेला नाहीं.

सुंदर व कमल यांना, अभ्यासाच्या निमित्तानें तीं एकत्र बसलीं असतां पाहून, सुंदरला आपला जामात बनविण्याचा विचार आतांशा दादासाहेबांच्या मनांत येत असतो. चांगलें शील जगांतली कोणती वस्तु मिळवूं शकणार नाहीं ?

समाप्त ।